म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

कर्मयोगमाला. पुष्प १ लें.

# महाराष्ट्र आणि हिंदुधर्म

( विषयनिवेदन )

लेखक:—वासुदेव.

मुद्रक व प्रकाशक

...शी, ज्ञानविलास प्रेस, पुणें.

REFBK-0003573

...त ५ आणे.

कर्मयोगमाला, पुष्प १ लें.

# महाराष्ट्र आणि हिंदुधर्म

( विषयनिवेदन )

लेखकः—वासुदेव.

लो. टिळकांनीं गीतारहस्याच्या प्रस्तावनेमध्यें उल्लेखिलेल्या ‘समानधर्म्या’स मोठ्या भक्तीनें अर्पण केलें असे.

—ग्रंथकर्ता.

मुद्रक व प्रकाशक
बाळकृष्ण भाऊ जोशी, ज्ञानविलास प्रेस, पुणें.

किंमत ५ आणे.

REFBK-0003573

## प्रकाशकांचे दोन शब्द.

लो० टिळकांच्या गीतारहस्यानें कर्मयोगाची जी लाट उसळून दिली, तिचा योग्य तो परिणाम त्या वेळीं झाला. पण त्यांचें याविषयींचें कार्य त्या वेळीं झालें नाहीं, तरी आतां लोकसमुदायास त्या गोष्टीची आठवण करून देऊन, या बाबतींत कांहीं कार्य झाल्यास पहावें म्हणून 'वासुदेव' यांस उत्कंठा लागून राहिली आहे व हल्लींच्या परिस्थितीमध्यें अशा तऱ्हेच्या निरलस जीवनक्रमाची जरूरी महाराष्ट्रास व हिंदुस्थानासही किती आहे याचें विवेचन त्यांनीं या पुस्तकांत, अगदीं वेदकालापासून आधुनिक कालापर्यंतचें पर्यालोचन करून, निःपक्षपातानें केलेलें आहे. शिवाय स्पष्टोक्ति, निर्भीड भाषासरणी व विषयवर्णनाची शैली इत्यादि गुणांमुळें या पुस्तकास एक तऱ्हेचें वेधक स्वरूप आल्यानें प्रत्येक महाराष्ट्र तरुणानें तें अवश्य वाचावें असें आम्हांस वाटतें. लेखकांची व त्यांच्या या औत्सुक्यपूर्ण नव प्रयत्नांची वाचकांस इतकीच ओळख सध्यां तरी पुरे असें वाटतें.

# प्रस्तावना.

हिंदुधर्मसंघटणाबद्दल लिहिण्याचा विचार मनांत घोळत असतां, सध्यांच्या प्रसंगीं असलं एकांगीपणाचे विचारच केवळ प्रदर्शित करणें बरोबर होणार नाहीं असें वाटल्यावरून, धर्म आणि व्यवहार या दुहेरी कर्तव्याकडे समाजाचें लक्ष्य ओढण्याचाच मार्ग आम्हांस अधिक पसंत पडला. महाराष्ट्रास लो. टिळकांनीं आपल्या गीतारहस्यानें ज्ञान करून दिलें आहे, पण त्याचे आचरणासच कोणी मिळत नाहीं, हीच काय ती वाण! जुनी पिढी तर जून झालीच! तिला कितीही वळविली तरी ती वळणार थोडीच! होतकरू पिढीच्या फार मोठाल्या आकांक्षा आहेत. पण समाजाचें वळण निर्जीवपणाचें असल्यानें, युवकांच्या डोळ्यापुढें जें ध्येय व ज्ञान ठेवावयास पाहिजे तें ठेवलें जात नाहीं. त्यामुळें 'खरा मुत्सद्दी' बनावयाची इच्छा एकाद्या युवकाची असल्यास त्यास जगांतील व्यवहाराकडे उघड दृष्टीनें पहाण्याचें लक्षांत देखील येत नाहीं! ही महाराष्ट्र युवकांची असहाय स्थिति नाहींशी करण्याकरितां, या निबंधामध्यें जिवंतपणाच्या दृष्टीचा थोडासा उपयोग करून, ध्येय व त्याकडे पोंचविणारा मार्ग याचें दिग्दर्शन केलें आहे. ही विचारसरणी पटून त्यापासून इष्ट परिणाम देखील घडून येणें अशक्य नाहीं!

शेवटच्या प्रकरणामधील कर्मयोगाश्रमाबद्दलचे विचार जनतेस पसंत पडलेसे दिसल्यास, हाच विषय हातीं घेऊन, 'कर्मयोगमाला' म्हणून माला, शक्ति येईल त्याप्रमाणें, जनतेपुढें मांडण्याचा विचार आहे. कर्मयोगाश्रमाकरितां कर्मयोगाची हल्लींच्या परिस्थितीस योग्य अशी रूपरेखा देखील शास्त्र्यांकडून कायम करून घेतां यावी याच हेतूनें या प्रथम प्रयत्नास आम्ही अगाऊच त्या मालेचें नांव देऊन, हे प्रास्ताविक विचार मालेचें प्रथम पुष्प या नात्यानें, जनतेनें आपले या विषयाचे विचार अगाऊ कायम करावेत म्हणून प्रसिद्ध केले जात आहेत. योगेश्वर श्रीकृष्णाच्या कृपेनें या कर्मयोगाचें अवलंबन अधिकाधिक वाढून, हल्लीं मनोराज्याप्रमाणें वाटणाऱ्या कल्पना खऱ्या स्थितीमध्यें अस्तित्वांत देखील येतील, नाहीं कोणी म्हणावें! —ग्रंथकर्ता.

## विषयानुक्रमणिका


प्र. १, आर्यावर्त.

आर्यांच्या मूळ निवासस्थानामधील परिस्थिति–तेथून त्यांचें दक्षिणेकडे मार्गक्रमण–पूर्वेकडे व पश्चिमेकडे आर्यांमधील फाटाफूट–आर्यावर्तांत येण्यासाठीं आलेल्या अडचणी व पोंचल्यानंतरचे त्यांचे विचार–आर्यधर्माची वाढ–व त्यास आलेल्या प्रस्तुतकाळच्या हीन परिस्थितीचा विचार. ... ... १–१२

प्र. २, मध्यकाल.

कर्म, ज्ञान, ज्ञानयुक्त कर्म यांविषयीं पूर्व इतिहासाचें सिंहावलोकन –आणि मध्यकाळच्या आर्यावर्तांतील लोकसमाजाच्या धार्मिक, सामाजिक व राजकीय अवनतीचा इतिहास. ... १२-२३

प्र. ३, भारतवर्षांतील काळोख.

ब्रिटिश सत्तेच्या उगमापासून आतांपर्यंतच्या राजकीय परिस्थितीचा इतिहास–लोकसमाजावर होत असलेले परिणाम व त्याविषयीं विवेचन. २३-३४

प्र. ४, भविष्यत्काळचा नकली सूर्यप्रकाश.

सुधारणांचा फोलपणा–समाजांतील दुबळेपणाचें दिग्दर्शन–जातिभेद–व्यापार उदीम यांच्या अवनतीचीं कारणें. ... ३४-४६

प्र. ५, महाराष्ट्र आणि हिंदुधर्म.

मानवी प्रयत्नास ईश्वराची मदत–आत्मशक्तीचा विकास–आर्यधर्माप्रमाणें समाजोन्नतीचे प्रयत्न करण्याबद्दल आग्रह–मराठी साम्राज्यास रामउपासनेचा आधार–कर्मयोगाश्रम–पुढाऱ्यांतील दूरदर्शित्वाचा अभाव–महाराष्ट्राचें महत्त्व व तें ओळखून समाजोन्नतीनें स्वधर्म व स्वराज्य हीं आपलींशीं करून घेतल्यावर स्वधर्माचा जगांत प्रसार करण्याच्या ध्येयाचा उपदेश. ... ... ४६-६२

नं. ........
ना. ........



मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ठा. ........
नं. ३५८३
ग्रंथ : ठाणें

# महाराष्ट्र आणि हिंदुधर्म

## (१) आर्यावर्त

आर्यावर्त हा शब्द उच्चारला कीं भारतवर्षाच्या प्राचीनकालच्या स्वरूपाचा अद्भुत देखावा डोळ्यांपुढे खाडकन उभा राहतो व अंतःकरणास आनंदाचें भरतें येतें! उत्तरेकडून या सुसमृद्ध देशांत प्रवेश केल्यावर, गंगायमुनादिक नद्यांनीं सुपीक केलेला प्रदेश आर्य लोकांना प्रथम आढळला असेल त्या वेळीं भविष्यत् कालाबद्दल त्यांच्या मनांत काय विचार आले असतील त्याची कल्पना करतां येणें अशक्य नाहीं. ते मनांत म्हणाले असतील कीं, "एवढा श्रम आणि अडचणी सोसून कूच दरकूच, मजल दरमजल करीत वसति-स्थानास योग्य अशा तऱ्हेचा देश शोधून काढण्यांत जीं कित्येक वर्षे (अथवा पिढ्या सुद्धां असतील) आम्हांस घालवावीं लागलीं, त्या सर्वांचें आज सार्थक झालें! काय तो उत्तर दिशेकडील प्रदेश! केवळ बर्फमय! थंडी म्हणजे मी म्हणत असे. तेथें ना झाड ना झुडूप. जिकडे पहावें तिकडे दृष्टीच्या टप्प्याच्या बाहेर कित्येक मैलपर्यंत पसरलेलीं वालुकामय मैदानें व जेथें मैदानें नसतील तेथें उघडेबोडके डोंगर व उंचवटे असून ते देखील वनश्रीच्या अवकृपेमुळे रखरखित व बापुडवाणे दिसणारे! पाणी सांपडलें तर महद्भाग्य समजावें! तेथें जीवाचें जीवन जें अन्न त्याचा अभाव असल्यामुळें जीवांची कालक्रमणा व उत्क्रांति होण्याची गोष्ट म्हणजे केवढी दुष्कर! उत्तरकडे नजर टाकावी तर भगवान् सहस्ररश्मि भास्कराच्या प्रतापासही न जुमानतां उलट त्याच्या तेजानें झळाळणारे बर्फाचे पुंडांत धुंड मोठ्या गर्वानें प्राणिमात्रांना

तुच्छ लेखीत असलेले! पूर्वेकडे धनधान्यजलविरहित लांबच लांब पसरलेलीं सपाट मैदानें! त्यांचा अंत कोठवर पहावयाचा? पश्चिमेकडे पहावें तों दुर्गम पहाडांची लांबच लांब भिंत दक्षिणोत्तर बाजू अडवून राहिलेली सालोसाल गोधनास चारा व प्राणिमात्रास अन्न हीं मिळेनाशीं झालीं म्हणजे त्यांचा शोध करीत देशांतर करावे! याप्रमाणें राहिलेल्या दक्षिण दिशेकडे आपलें मार्गक्रमण होऊं लागले. बरें झालें कीं, या आक्रमणामध्यें देखील एखादा दुर्गम प्रदेश येऊन हाही आमचा मार्ग खुंटला नाहीं! तरी देखील येथें येण्यासाठीं आम्हांस कांहीं कमी त्रास सोसावा लागला नाहीं. वस्ती करण्यासारखें ठिकाण जवळपास नसलें म्हणजे महिनेच्या महिने आमची घोषयात्रा चालू रहावी! कोठें पाणी नाहीं तर कोठें निवारा नाहीं. कोठें नुसतीं वाळूचींच मैदानें तर कोठें उंच उंच दुर्गम पर्वत. कोठें वादळामध्यें अगर वालुकाराशीमध्यें सबंध घोषच्या घोष गडप होण्याची भीति, तर कोठें दिवसा दो दिवसांत पाणी मिळालें नाहीं तर खिल्लारांचा नाश होणार म्हणून भीति! एक ना दोन, अशा अनेक अडचणी. कोठें एखादा साधारण बरा दिसणारा प्रदेश दिसला कीं, पुढें जाण्याची हिंमत खचून तेथेंच कांहींनीं वास्तव्य करावे. याप्रमाणें निघाल्यापासून आम्हांमध्यें कितीतरी फाटफूट झाली असेल. सुमारें अर्धमार्गावर आल्यावर तिकडेच पश्चिमेकडे थोड्याच अंतरावर सुसंपन्न देश आहेत असें आम्हापैकीं कांहींना शोध करतांना तेथील मूळच्या कायम रहिवाश्यांकडून समजलें. परंतु प्रदेशाच्या रूपरंगावरून आमचा विश्वास त्यावर बसला नाहीं. पण आमच्यापैकीं ज्यांनीं ती बातमी आणली होती ते केवळ पोटार्थी व कांहीं अंशीं भीरु असल्यामुळें त्यांनीं तिकडे जावयाचें ठरविलें. ते व त्यांच्याबरोबर त्यांचेच जातभाई आणखी कांहीं, असे एकदम फुटून निघाल्यामुळें, आमचे घोष म्हणजे पूर्वीच्या सुमारें निम्म्याएवढेच राहिले. ते गेले, त्यांची काय अवस्था झाली असेल कोण जाणे! त्या बाजूस जवळपास कोठें हल्लीं आम्हांस सांपडलेल्या प्रदेशासारखा

प्रदेश असेलसें वाटत नाहीं. कदाचित् आम्हांप्रमाणें तेही त्या बाजूस लांबवर गेले असतील. कारण परत येते तर मध्यंतरीं जे आमचे चारचार पांचपांच संवत्सरांचे मुक्काम झाले, तेवढयामध्यें ते आम्हांस येऊन मिळाले असते. असो; ते गेले, त्यासारखा त्यांस योग्य आश्रय मिळाल्यास त्यांत आम्हांस आनंदच आहे. याप्रमाणें त्यांना आश्रय मिळाला नाहीं तर त्यांच्या उच्छृंखलपणाचें फळ तेच भोगतील ! बाकी ही फूट झाली हें एक बरेंच झालें असें म्हणावयास पाहिजे. कारण ते जरी आमचेच होते तरी आत्मोन्नतीपेक्षां त्यांचें खुशालीकडेच त्यांचें फार लक्ष असे. आणि त्यांनीं आपला थोडी थोडी बातमी मिळतांच निराळ्या मार्गास वळविला त्याचें कारण म्हणजे हेंच कीं, अशा तऱ्हेचें स्वार्थी वर्तन केलेलें आम्हांस खपत नसे. आम्हांस तरी त्यांच्या या नाठाळपणापासून थोडा का त्रास होता ! व्रात्य हा शब्द त्यांना लावण्याची कल्पना आम्हांपैकींच एकानें काढली, पण ती प्रचारांत आली नाहीं एवढेंच. दुष्कर्माकडे त्यांची प्रवृत्ति फार असल्यामुळें, आम्हांस एखादे वेळीं असें वाटतें कीं, आपसामध्ये कलह चालू ठेवण्यासाठींच कीं काय ही दुर्बुद्धियुक्त प्रजा त्या प्रजापतीनें निर्माण केली असावी ! असो, ते नाहींसे झाले. आतां काय त्याचें ! बाकी ते तिकडे गेले तेंच बरें झालें. नाहीतर या स्वर्गतुल्य पुण्यभूमीला त्यांनीं थोडक्याच वेळात नरकभूमीचें स्वरूप आणलें असतें. त्यांची असूया करण्याचें आतां कारण नाहीं. त्यांचा तो त्रास नाहीं, व त्या वेळची ती चरितार्थाची आतां कोणत्याही प्रकारची काळजी नाहीं. सुखानें कालक्रमणा करावी व मृत्युसमयीं भगवान् विष्णूचें स्मरण करीत वैकुंठाप्रत गमन करावें. याशिवाय ऐहिक संसारयात्रेमध्यें आणखी दुसरें काय करावयाचें आहे ! ती भाऊबंदकी, तीच काय ती एक भीति होती. परंतु येथें आम्हांबरोबर ते आले असते तर ती भीति आम्ही तावडतोब त्यांना सुधारून नाहींशी केली असती किंवा शत्रु म्हणून त्यांच्याशीं युद्ध करून त्यांचा निःपात केला असता ! परंतु अशा गृहकलहाचें पातक आम्हांस लागण्याची भीति आतां

राहिलेली नाहीं. आचंद्रदिवाकरौ आमचें वास्तव्य येथेंच राहिलें तरी आतां पुनः त्या दुष्कर्मी लोकांचा केव्हांही संसर्ग होण्याची भीति नाहीं. सुसंपन्न प्रदेशाबरोबर शांततेचाही लाभ परमेशानें आम्हांस दिल्यानें आम्हांस व आमच्या पुत्रपौत्रांस आत्मोन्नतीचें चिरकालिक साधनच प्राप्त करून दिल्या॰ सारखे झालें आहे. तेंच आमचें आम्हांस सदैव टिको व आमच्या त्या भाऊबंदांचा अगर दुसऱ्या कोणाचा संबंध येऊन आमच्या वंशजांस त्यांज-पासून त्रास न होवो, एवढेंच आता मागणें आहे; दुसरें काय ! ”

ते आणखी असेंही म्हणाले असतील कीं,—“ बरें झालें ! या प्रदेशांत नद्द सरोवरें मुबलक आहेत, सुपीक जमीनही पुष्कळ आहे;फुलपुष्पांनीं भरलेः गगनचुंबित वृक्षांचीं दाट वनेंही आहेत, त्याचप्रमाणें कुरणेंही आहेत. कोणत्याही गोष्टीचा तोटा नाहीं. दैवयोगानें प्रजेची वाढ झाल्यास चोहोंकडे अंत नाहीं अशा प्रकारचा मुलूखही पुष्कळ आहे, असें कोठें कोठें दृष्टीस पडणाऱ्या या प्रदेशांतल्या अरण्यवासी लोकांकडून समजलें. हे लोकही फार थोडे असून त्यांजपासून आपणांस उपसर्ग होण्याचीही फारशी भीति नाहीं. कारण ते बिचारे अगदींच अडाणी असून थोडे कुमकुवतही आहेत. आपले शेजारी या नात्यानें त्यांना वाढवून त्यांची उत्क्रांति केल्यास त्यांच्याशींही कलह करण्याचें कारण उद्भवणार नाहीं. पुढें दक्षिणेकडे चोहोंकडून समुद्र आहे म्हणतात व उत्तरेकडे तर प्रदेश किती दुर्गम आहे तें आम्ही स्वतः पाहिलेंच आहे. परमेश्वरानें इतक्या भयंकर अडचणींत उत्पन्न केलेलें हें एक स्वर्गीय उपवनच आहेसा भास होतो ! ”

“ उत्तरेकडील हिमाच्छादित पर्वताच्या पलिकडच्या बाजूस जेव्हां आम्ही आलों, त्या वेळीं पुढ मार्ग निघेना. जिकडे पहावें तिकडे हिमालय ! एक वेळ असें वाटलें कीं, परमेश्वरानें उत्तरेकडे हिमालय व दक्षिणेकडे हिमालय उत्पन्न करून ठेवून मध्यें मानवजातीचा कोंडमाराच केला आहे ! बरींच वर्षें शोध करतां फक्त नैर्ऋत्येच्या बाजूस एके ठिकाणीं मार्ग निघेल असा

संभव दिसूं लागला. त्या मार्गानें जाण्याचा प्रयत्न करतां करतां कित्येक लहानसहान घोष नाश पावले असतील! शेवटीं सर्वांनीं मिळून संघटित प्रयत्न केल्यावर कोठें यश आलें! तरी आम्ही आपल्या बरोबर आणलेल्या कामधेनूंपैकीं फारच थोड्या या बाजूस येऊं शकल्या. परंतु हा या बाजूचा प्रदेश आतां पाहिल्यावर, त्या त्रासाचें व अगर झालेल्या नुकसानीचें, आतां कांहीं वाटत नाहीं. एवढेंच नव्हे पण आतां असें वाटूं लागलें आहे कीं, दक्षिणेकडे समुद्र व उत्तरेकडे हा हिमाच्छादित दुर्गम प्रदेश यांमध्यें ही पवित्र भूमि निर्माण करून तिची एक प्रकारची निरंतरची सुरक्षितपणाची तरतूदच परमेश्वरानें करून ठेविलेली आहे. कारण आम्हीं केला एवढा मोठा प्रचंड यत्न करून या मर्यादा ओलांडण्याचें सामर्थ्य प्रत्यक्ष [illegible]ला-वांचून दुसऱ्या कोणासही नाहीं. भो जगदुत्पादक परमेश्वरा! या देशाचा लाभ आम्हांस व आमच्या वंशजांस असाच अखंड मिळो म्हणजे झालें!"

वरील प्रार्थना केली गेली असेल त्या वेळीं आर्यांच्या या नूतन वसति-स्थानांतील वास्तुदेवतेनें 'तथास्तु' असा हुकार दिला नसला पाहिजे, असें आतां खात्रीलायक सांगतां येतें. मानवजातीच्या प्रगतीच्या त्या आरंभ-कालीं या प्रदेशाच्या संरक्षणाची तजवीज इतक्या खंबीरपणानें केलेली आढ-ळून आल्यावर फार दूरच्या भविष्यत्कालीं ती अगदीं कुचकामाची ठरेल असें दुःस्वप्न प्रत्यक्ष निसर्गदेवतेस देखील त्या वेळीं पडलें नसेल; तर आनं-दानें संतुष्ट झाल्यामुळें ओथंबलेल्या विकारमय अंतःकरणांस त्याबद्दल दुश्चिन्हें एवढ्या लवकरच दिसणें त्या वेळीं शक्य असेल काय! अथवा या पुढील अवनतीची कल्पना सृष्टिकर्त्यास यदाकदाचित् असली तरी, ही त्रिगु-णात्मक सृष्टि एकदां निर्माण झाल्यावर—प्रत्येक गुणाच्या अनेक कलांचा एकमेकींशीं होत असलेला हा गुणाकार एकदां तिच्या पसाऱ्यामध्यें सुरू [illegible] जीवसृष्टीमध्यें अवतारकार्याचें साहाय्य घेतल्याशिवाय या व्यक्तसृष्टीमध्यें अव्यक्त स्वरूपांत आगाऊ कांहीं योजना करून ठेवण्याचें

सामर्थ्य प्रत्यक्ष परमेश्वरांत देखील नाहीं. अशा तऱ्हेचा सृष्टिक्रम अखंड चालू ठेवणें हेंच किंबहुना या गुणाकाराचें कार्य असल्यामुळे, उलट पक्षीं निव्वळ 'असें कर, तसें कर' म्हणून परमेश्वराची प्रार्थना करून स्वस्थ राहण्याऐवजीं, आत्मसामर्थ्याच्या जोरावर या गुणाकारांतून वाट काढण्यासाठींच परमेश्वरानें मानवप्राण्यास अलौकिक बुद्धिमत्ता आणि आत्मस्वातंत्र्य या दोन देणग्या देऊन ठेवल्या आहेत. त्यांचा उपयोग त्यानें यथायोग्य केल्यास त्याच्या सर्व प्रार्थना आपोआप सफळ होऊन या मायासृष्टीच्या संसर्गानें होणारी त्याची हानि आपोआप थांबेल. एका मोठ्या खंडाचें इकडून तिकडे आक्रमण करणाऱ्या त्या आर्यांना या पुढील परिस्थितीची देखील अंधुक कां होईना पण थोडी तरी कल्पना कालांतरानें आल्याशिवाय राहिली नसेल. कारण मानवी जीविताच्या इतिहासाची रूपरेखा एकदां किंचित्काल जरी लक्षांत आली, तरी तिचा प्रवाह कोणत्या दिशेनें वाहत आहे व अखेर त्याचा अंत कशांत होणार हें ठरविणें त्या महात्म्यांस फारसें जड गेलें नसावें. त्यांनीं प्रतिपादिलेलीं धर्मतत्वें व त्यांचे मार्ग यांमध्यें कालपरंपरेप्रमाणें त्यांनीं व त्यांच्या वंशजांनीं जे फरक केले त्यांवरूनसुद्धां हल्लीं आपणांस निर्वेधपणें असे खास ठरवितां येतें कीं, मानवसंसाराची अखंड कालपर्यंत योग्य प्रगति एकसारखी होत जावी, हीच एक दृष्टि ठेवून त्याप्रमाणें बिनचूक मार्ग आंखून ठेवण्यामध्यें त्यांनीं भावी पिढ्यांवर फार मोठे उपकार करून ठेविले आहेत !

या हिंदुस्थानवासी आर्यांचा कालक्षेप केवळ उदरंभरण करण्यामध्येंच झालेला नाहीं. त्यांच्या जीवनक्रमाच्या वाढीबरोबर आत्मोन्नतीचीही वाढ झालेली आहे. मग ती पाऊस पडावा, गुरेंढोरें उत्तम स्थितीमध्यें असावीत व जीवन–क्रम सुखाचा जावा, वगैरे स्वार्थमूलक हेतूनें असो, अथवा त्यानंतरच्या कालामध्यें दिसून येणाऱ्या निस्वार्थपणामुळें असो. अग्नि, वरुण, सूर्य इत्यादिकांना त्यांनीं देवता मानून त्यांना संतुष्ट करण्यासाठीं निव्वळ कर्म-

मार्गापासून जरी त्यांच्या परमेश्वरविषयक कल्पनांना आरंभ झालेला असला तरी तेवढ्यावरच त्यांची आध्यात्मिक उत्क्रांति न थांबतां कर्म, ज्ञान, ज्ञानयुक्त कर्म वगैरे तत्वांची कालाबरोबरच प्रगति झालेली दिसून येते. उगीच अमुक एखाद्या व्यक्तीनें अमकी गोष्ट सांगितली, ती कांहीं लोकांस पसंत पडली व त्यांच्याबरोबर ती अनेकांमध्यें प्रसृत झाल्यामुळें तिला धर्मस्थापनेचें स्वरूप आलें, व त्या लोकांस त्या धर्माच्या अनुयायीपणाचा शिक्का मिळाला, अशा तऱ्हेनें निव्वळ अंधश्रद्धेच्या जोरावर हिंदुधर्माची वाढ अगर प्रसार झालेला नाहीं. सनातन आर्यधर्माचें नुसतें वरवर अवलोकन करणारास देखील त्याची उत्क्रांति अगदीं मानवजातीच्या उत्क्रांतीच्या आरंभकालापासूनची आहे हे लक्षांत आल्याशिवाय रहाणार नाही. कारण ज्या पंचमहाभूतांपासून पीडा होण्याचा संभव होता, त्यांना देवतांचें स्वरूप मिळण्याचा काल कोणता व जनस्थिति त्या वेळीं काय स्वरूपांत असेल, याची नुसती कल्पना तरी करतां येते. त्याचप्रमाणें वेदांत कर्मकांड व त्याबरोबरच ज्ञान अशा तऱ्हेच्या दुहेरी आज्ञा केलेल्या असून त्यांनाहीं अपौरुषेयत्व प्राप्त झालेलें आहे. यावरून मूळ वेदकाळ किती दूरचा असेल त्याबद्दल अंधुक कल्पना तरी होण्यासारखा आहे, आणि त्या वेळींही निव्वळ स्वार्थीपणाचा कर्मकांडाचाच उपदेश नव्हे, पण त्याबरोबरच ज्ञानाचीही कल्पना स्पष्टपणे दृढ झालेली दिसून येते. एवढेंच नव्हे पण प्रवृत्ति आणि निवृत्ति असे दोन्ही मार्ग देखील प्रथम मूळापासूनच अगदीं वेगवेगळे अस्तित्वांत आलेले आहेत. कोणत्याही एका विवक्षित कालीं, एखाद्या विवक्षित मताचा प्रसार देशामध्यें जोराचा असूं शकेल, परंतु मूळ सांगण्याची गोष्ट ही कीं, या सृष्टीमध्यें उत्पन्न झालेल्या सर्व चराचर व्यक्तसृष्टीचा आदि आणि अंत, खुद्द परमेश्वरापर्यंत नेऊन भिडविण्यापर्यंतचा सर्व प्रदेश त्या वेळेपासूनच आर्यांनीं आक्रमिलेला होता. या सर्व पसाऱ्याचा मूळ आरंभ कोठें आहे, मानवी बुद्धीचा आणि आत्मस्वातंत्र्याचा खरा उपयोग कसा करून घ्यावयास पाहिजे, वगैरे सिद्धांत आणि

ह्यांविषयीं खऱ्याखुऱ्या अनुभवांनीं निश्चित केलेले मार्ग यांच्या भरभक्कम पायावर सनातन आर्यधर्माची मांडणी व आंखणी झालेली आहे; व हीच गोष्ट आर्यधर्मास आजकाल जगामध्यें श्रेष्ठत्व देण्यास कारणीभूत झालेली आहे. एखाद्या मार्कोनीनें बिनतारी यंत्राचा शोध लावला किंवा एखाद्या एडिसननें विद्युत्‌शक्तीचा दुसऱ्या एखाद्या कार्याकडे उपयोग केला, कीं आधुनिक कालच्या जगास त्यांना 'कोठें ठेवूं, कोठें न ठेवूं' असें होऊन जातें. परंतु आर्यधर्मांत ग्रथित झालेला शोध व मार्ग आणि त्याचा परिणाम हे सर्व ऐहिक सृष्टीच्या वातावरणाच्या पलिकडचे असून त्यांनीं व्यक्त–अव्यक्त, सत्–असत् यांच्या परंपरेचा संबंध प्रत्यक्ष अनुभवाच्या जोरावर जगास विशद केलेला आहे. अधोमुख होऊन चाललेल्या सृष्टीस ऊर्ध्वमुख करून मूलभूत परब्रह्माशीं गांठ घालून देणारा मार्ग स्पष्टपणें आर्यधर्मानें दाखविलेला आहे. अव्यक्त परब्रह्मापासून सर्व सृष्टि हिंडून पुनः पहिल्या ठिकाणीं जाण्याचा हा वर्तुलाकृति मार्ग केव्हांही एकच असून त्या मार्गाचा अवलंब करून आपलें सार्थक करून घेणें हें केव्हांही मानवजातीचें ध्येय असलें पाहिजे. व्यक्त सृष्टीशीं आमरणान्त आपलेपणा बाळगून तन्मय झालेला जनसमाज आजकाल आपल्यास चोहोंकडे दिसतो. जे दिसेल तेंच खरें, व जें दिसत नाहीं अगर प्रत्यक्ष अनुभवतां येत नाहीं अशा काल्पनिक वस्तूस चमत्कृति ( Mysticism ) असें तुच्छतादर्शक नांव दिलें जातें. जें प्रत्यक्ष दिसतें त्यामध्ये फेरफार करून त्यापासून दुसरें कांहीं निराळें नामरूप उत्पन्न करण्याच्या प्रकारास खरेखुरे शास्त्र असें नांव मोठ्या अभिमानानें देण्यांत येतें ! या नामरूपांच्या अदलाबदलींत जें राष्ट्र ज्या मानानें जास्त प्रगति करतें त्या मानानें त्याची योग्यता जास्त मानण्यांत येऊन त्या प्रगतीस मानावी उत्क्रांती ( Civitisation ) चा शिक्का देण्यांत येतो ! खरीखुरी उत्क्रांति कशामध्यें आहे याचा विचार कोणी करीत नाहीं. ज्या नामरूपांची अदलाबदल करण्यामध्यें धन्यता वाटते त्या नामरूपांच्या

खालीं असलेल्या तत्वाबद्दल मात्र कोणी विचार करीत नाहीं : हा एक तऱ्हेची भ्रांति आहे व यासच मायाभास म्हणतात. या आभासामुळें प्रत्यक्ष दृश्य सृष्टीमध्यें मृत्यूसारख्या भयंकर गोष्टी आसपास दिसत असून देखील त्यांविषयीं सर्व जन्मभर एक क्षणमात्र विचार करण्याची कोणास जरूरी वाटत नाहीं. मायेचा हा प्रताप केवढा जबरदस्त आहे हें यावरून लक्षात येईल. या प्रतापामुळेंच केवळ दृश्य सृष्टीमध्ये मानवी जीव दुर्बल होऊन राहिला आहे. या दुर्बलतेचा निःपात करण्याचें सामर्थ्य उत्पन्न करणारा प्रतापशाली आर्यधर्म म्हणजे या कर्मचक्रांतून सुटका करून मानवजातीस खऱ्याखुऱ्या ध्येयाप्रत पोंचविणारा एक अलौकिक राजमार्ग आहे. नामरूपांच्या तडाख्यांत सांपडलेला या पृथ्वीवरील जनसमाज या मृगजलाच्या मागें धावतां धावतां थकून जाईल, त्या वेळीं असा एक काल येईल कीं, या राजमार्गाचें अवलंबन करणें जास्त सोइस्कर व सुखावह आहे अशी लोकांची खात्री पटेल. परंतु तोपर्यं वाट पहाण्याची आर्यधर्म-वाधरमणीस जरूरी नाहीं. आर्यावर्तामध्यें हा देदीप्यमान सूर्य आपल्या पूर्ण तेजानिशीं अस्तित्वांत असतांही अज्ञानतमानें बराच काल हल्लीं झाकून गेल्यामुळें त्यास मलिनता आल्यासारखी दिसत आहे. त्यामुळें त्यास इतकी दीनावस्था आलेली आहे कीं, आर्यधर्म म्हणजेच मिस्टिसिझम व आर्यावर्तांत वास करणारे लोक म्हणजे लाथेखालीं तुडविले जाण्यास योग्य असे पशुतुल्य ‘ काळे अदमी ’ असा समज हल्लीं सर्व जगांत रूढ झालेला दिसतो !

मानवी जीवितास ज्यानें मार्ग दाखविला, या ब्रह्मांडाच्या तळाशीं असलेल्या तत्वांचा ज्यानें बोध केला, जीवाची शिवाशीं ज्यानें भेट करविली, अशा तऱ्हेचा सर्व जगास आधारभूत होण्यासारखा, व ‘सनातन’ म्हणून ज्याचें अमरत्व सिद्ध झालें आहे, असा हा आमचा आर्यधर्म इतक्या शोचनीय स्थितीस प्राप्त झालेला आहे, ही गोष्ट आर्य अगर हिंदु म्हणविणाऱ्या प्रत्येक इसमाच्या हृदयास शल्यासारखी टोंचून रहावयास पाहिजे ! परंतु

आज पहावें तों कित्येकांस त्या आर्यधर्माशीं आपला संबंध जोडला तर अभिमान वाटण्याऐवजीं उलट बेइज्जत झाल्याशी वाटते ! यास कारण म्हटलें म्हणजे हिंदुधर्माविषयींचें जनतेचे गाढ अज्ञान, स्वाभिमान व आत्मविश्वास यांचा अभाव, शारीरिक आणि मानसिक दुर्बलता व या सर्वांवर कळस चढविणारें गुलामगिरीचें पारतंत्र्य हीं होत ! या गोष्टींविषयीं आणखी पुढें एकाद्या प्रकरणात विचार करण्यांत येईल. तूर्त येथें एवढेंच दाखविण्याचा हेतु आहे कीं, आधिभौतिक सुखवादाच्या मागें लागलेल पृथ्वीच्या पाठीवरील सर्व देश त्या सुखाचा शोध करीत असतां मायेच्या पसाऱ्यांत गुंतून ऐहिक सुखांतच आपल्या जीवितकर्तव्याची इतिश्री मानीत आले आहेत. ऐहिक सुखाबद्दलची ही तृष्णा थोडक्यावरच थांबविली जात नसल्यानें ती आणखी पुढें किती काल व प्रदेश व्यापून राहील याची कल्पनाही करणें अशक्य आहे. मानवी बुद्धीची कल्पना ज्या॰प्रमाणें अमर्यादित स्वरूपाची होईल त्या मानानें या तृष्णेची मर्यादाही एक-सारखी वाढत रहाणार हें उघड आहे. परंतु या सुखशोधामुळें उत्पन्न होणाऱ्या जिवनार्थ कलहाची तीव्रता किती वाढेल याचा नुसता विचार देखील करतां येत नाहीं. रेडिओच्या या काळामध्ये पृथ्वीच्या पाठीवर पार॰तंत्र्यांत खितपत पडलेले देश किती आहेत याचा आपण विचार केला तर आणखा हजार पांचशें वर्षांनीं दुसरे शोध लागतील त्या वेळीं आणखी काय फेरफार होतील व ते कोणास भोंवतील तें सांगवत नाहीं.

ही तीव्रता व मानवजातीची होणारी कुचंबणा थांबविण्यास एकच उपाय आहे व तो म्हणजे ऐहिक सुखाची अनावर झालेली तृष्णा गाडून टाकणें हा होय. अमर्यादपणें वाढणारी ही तृष्णा म्हणजे जगाच्या इति-हासांत विषमता उत्पन्न करणारी एक मोहिनीच होय. या मोहिनीनें आज-काल सर्वांस गुंगवुन टाकलें आहे. गुलामगिरीमध्यें देखील इतर कोणत्याही विचारापेक्षां या तृष्णेनेंच आम्हांस स्वर्गसुखाचा आभास दाखविलेला

आहे. आपल्या देशाशीं बेइमान होण्यांत कमीपणा वाटत नाहीं, आपला देश गुलाम झालेला उघड्या डोळ्यांनीं पाहवतो, पण आपल्या नांवापाठीमागें असलेला सरदारीचा किताब नाहींसा झालेला पाहवणार नाहीं ! आधिभौतिक सुखाच्या तृष्णेच्या गुंगीप्रमाणेच, पारतंत्र्याच्या बेशरमे-पणीही एक प्रकारची ही गुंगीच असते. आपल्या देशावर अत्याचार ओढव-लेले पाहवतात, पण आपल्या धन्याकडे वांकड्या नजरेनें पाहिलेलें कित्येक अधम व्यक्तींस खपत नाहीं.

परंतु मनावर ताबा ठेवून या तृष्णेच्या कटपटीतून जर जगाची एकाद्या चमत्कारानें सुटका होईल, तर जगांत होत असलेले अनेक अत्याचार एकदम बंद होऊन, अखिल मानवजातीस सुख मिळेल. उपरिनिर्दिष्ट आर्यलोक आर्यावर्तांत आल्यानंतर बराच काल अशा तऱ्हेचें सुख त्यांना या भारतनि-वासांत मिळालें असेल आणि तोच काल आज जगाच्या इतिहासांत मोठ्या उज्ज्वलतेनें चमकत आहे. आर्यधर्माचें खरें स्वरूप याच कालांत कायम झालें व 'सनातन' या पदवीची सार्थकता सिद्ध झाली. मानवी जीविताचें एक अलौकिक उज्वल उदाहरण म्हणून आज त्या कालाकडे दृष्टि फेकणारास देखील एक तऱ्हेचें समाधान वाटूं लागतें. तें तत्वज्ञान, त्या ललितकला, ते शूरवीर आर्यलोक, ते महात्मे ऋषि, ते अश्वमेध यज्ञ करणारे सुसंपन्न शूर राजे, त्यांच्या त्या सुखी राजनिष्ठ प्रजा, या सर्वांचें चित्र हृदयास क्षण-मात्र रंजवितें. त्या वेळची ती समृद्धि, आपापसामध्यें न्यायानें वागण्याची ती साधी पद्धत, राजापासून रंकापर्यंत सर्वांच्या जीवनामध्यें दिसून येणारें तें सुख, संतोष आणि अखेर पारमार्थिक कल्याण. किती तरी उत्कृष्ट चित्र आज आपणांस भासमान होतें ! परंतु पुढें काय ? आज त्याच आर्यांचे वंशज म्हणून मोठ्या अभिमानानें छाती ठोकून सांगणारे आम्ही कोणत्या अवनतीच्या खंदकांत खितपत पडलों आहों याची कल्पना देखील मनास भेसुर वाटते !

स्वप्नभंग

# ( २ ) मध्यकाल

सनातन आर्यधर्माच्या अनुयायांचा आजपर्यंत जो ऱ्हास होत आलेला आहे त्याचें कारण शोधून तें नाहींसें करण्याचा प्रयत्न प्रत्येक व्यक्तीनें केला पाहिजे. ही कर्मभूमि म्हणजे एक प्रकारचें यज्ञकुंड असून त्या यज्ञकुंडामध्यें एक प्रकारचा कर्मयज्ञ सृष्टीच्या आरंभापासून चालत आलेला आहे. वेद-कालापासून निवृत्तिमार्गाची उत्पत्ति जरी अगदीं निराळी झालेली असली, तरी या कर्मयज्ञाची पूर्तता न करतां केवळ निवृत्तिमार्गाचेंच आचरण करतां येणें ही गोष्ट अशक्य आहे. कारण ही सर्व चराचर सृष्टि कर्मचक्रानें वेढ-लेली असल्यामुळें कर्माशिवाय या सृष्टीमध्यें एक क्षणभर देखील राहतां येणार नाहीं. या कर्मचक्राच्या योगानें कदाचित् आपण आपल्या ध्येयापासून च्युत होऊं, म्हणून निवृत्तिमार्गाचा अवलंब करण्याचें समाजानें मनांत आणलें, तर कर्ममय सृष्टीनें सभोंवार वेढिलेल्या जीवाची स्थिति फार शोच-नीय होऊन जाईल यांत संशय नाहीं.

या जगामध्यें मनुष्यप्राण्याची ज्या वेळीं, आपल्या सभोंवारच्या वस्तूंकडे पाहून, विचार करण्याएवढी वाढ झाली असेल, त्या वेळीं ज्या ज्या वस्तूमध्यें त्याच्या अंतःकरणांतील सात्त्विक भावनेचा उत्कर्ष करण्याची शक्ति असेल त्या त्या वस्तूंना त्यानें साहजिकच महत्त्व दिलें असेल-त्याच्या कल्पनेप्रमाणें त्याचा ऐहिक संसार निर्वेधपणें चालण्यासाठीं त्यानें त्या वस्तूंची अनेक प्रकारें आराधना केली असेल. पुढे ऐहिक सुखावरच केवळ न विसंबतां पारलौकिक सुखाची तजवीज देखील कोणत्या प्रकारें करतां येईल हा विचार त्याच्या मनापुढं उभा राहणें साहजिक आहे. परंतु त्यास पुढें असेंही कळून आलें असेल कीं, ही सृष्टि झाली तरी कर्ममयच असणार व ऐहिक सुखाबरोबरच पारलौकिक सुखाचें साधन केलें तरी या कर्मयज्ञांतून सुटका होणें कांहीं झालें तरी अशक्य होय. याच कल्पनेचा विकास पुढें

' ज्ञानयुक्त कर्म ' या तत्त्वामध्यें झालेला आपणांस पहावयास मिळतो. कारण निव्वळ ज्ञानास जर कर्माची जोड नसेल तर सृष्टींतील सर्व व्यवहार समाधानकारक रीतीनें चालणें शक्य नाहीं. भारतवर्षामध्यें या ज्ञानयुक्त कर्माचा प्रश्न एवढ्या निकडीनें समाजापुढें केव्हांही आला नसेल, एवढें महत्त्व त्यास आजकाल आलेलें आहे !

या सर्व तत्वांची ज्या वेळीं हळू हळू उत्क्रांति होत गेली असेल, त्या वेळीं जीवनार्थ कलहाची तीव्रता फार सौम्य स्वरूपांत असावी; अथवा कदाचित् ती बिलकूल अस्तित्वांत नसेलही. वाढत्या लोकसंख्येबरोबर, वाढ-ण्यासारखी अमर्याद संपदा चोहोंकडे पसरलेली असल्यानें तिचा उपयोग करून ऐहिक व त्याबरोबरच पारमार्थिक कल्याण साधण्याकडेच त्या वेळीं बहुजनसमाजाची प्रवृत्ति फार करून असेल. या त्यांच्या अलौकिक स्थितीचें चित्र ज्या वेळीं आपल्या मनःचक्षूंपुढें उभें राहतें, त्या वेळीं कर्मकांडास ज्ञानाची जोड कशी व कां मिळाली असेल त्याबद्दल उलगडा होतो. ऐहिक संसारसुखाचा पूर्णपणें अनुभव घेतल्यावर या कर्मचक्राचा संन्यास करून अंतिम ध्येयाचें साधन करण्यास त्या वेळीं कोणतीच अडचण नव्हती. एवढेंच नव्हे, तर ज्यांना या ऐहिक संसाराची निस्सारता स्पष्टपणें व्यक्त झालेली असे, त्यांना तर ही कर्मचक्राची पायरी चुकवून एकदम कर्मसंन्यासाची कांस धरण्याची प्रवृत्ति झाली असेल. त्या वेळीं ऐहिक जीवनयात्रेकरितां कर्मास अजिबात फाटा देतां येण्यास योग्य अशा तऱ्हेची समाजस्थिति शांत-तेची असली पाहिजे. ऐहिक जीवनयात्रेसाठीं कर्मचक्राची जरूरी जितक्या तीव्रतेनें समाजास भासते, त्या मानाने तो समाज त्या चक्रामध्यें जास्तजास्त गुरफटून जातो. आणि याच कल्पनेचा विरोधी विकास पुढें केला तर कर्म-त्यागप्रधान बहुजनसमाजावर जर कर्मचक्राचा अवलंब करावयास लावणाऱ्या आपत्ति एकामागून एक कोसळल्या, तर कर्मकौशल्याच्या अभावामुळें त्या समाजाचा नाश होण्यास वेळ लागत नाहीं. आणि म्हणून या सृष्टीमध्यें

कर्म प्रधान असल्यानें तीमध्यें उत्तम स्थितींत राहण्यासाठीं स्वतःच्या जीवनक्रमामध्यें कर्मकौशल्याचा अवलंब करण्यासाठीं समाजानें केव्हांही हयगय करतां कामा नये. याच कल्पनेस अनुसरून निष्काम कर्मयोगाचें तत्व प्राचीन कालापासून प्रस्थापित झालेलें आहे. हें यज्ञचक्र सृष्टिक्रमाप्रमाणें अप्रतिहत एकसारखें चालू ठेवून ज्ञानानें त्यांतून आपला मोक्ष साधण्यासाठींच भगवान् श्रीकृष्ण यांनीं पुनःपुनः निष्काम कर्मयोगाचा उपदेश अर्जुनास केलेला आहे. परंतु पुढें समाजस्थितीमुळें या तत्वाचा अवलंब करावयास लागण्यासारखी तीव्रता लोकांना कदाचित् न भासल्यामुळें या अमोलिक तत्वाचें आचरण समाजाच्या हातून व्हावें तसें झालें नाहीं, आणि बहुजनसमाज या कर्मकौशल्यास पारखा झाला. या असहाय स्थितीमध्यें आर्यावर्तावर ज्या अनेक संकटपरंपरा पुढें कोसळल्या, त्यांना तोंड देण्याचें सामर्थ्य समाजाच्या अंगीं राहिलें नसल्यानें, त्या अडचणींपुढें आपली मान तुकविण्यापलिकडे फारसें शत-कृत्य समाजाच्या हातून न झाल्यामुळें कर्मत्यागही नाहीं, ज्ञान नाहीं, कर्मयोगही नाहीं, चोहोंकडे पारतंत्र्याचा गाढ अंधकार व त्यामध्यें उदरंभरणार्थ कर्म अशा तऱ्हेच्या शोचनीय अवस्थेमध्यें भारतवासीयांच्या कित्येक पिढ्या गेल्या ! अशा रीतीनें पशुवत् आचरण करावयास भाग पडलेल्या समाजाची एकदां निरुपायाची स्थिते झाली म्हणजे त्याचा नाश होण्यास वेळ लागत नाहीं. हल्लीं हिंदुस्थानांत चोहोंकडे नजर फेंकल्यास आपणास हीच असहाय स्थिति चोहोंकडे निदर्शनास येईल.

वरील विषयाचा विचार करीत असतां, समोरच्या आम्रवृक्षाच्या फांदीवर बसलेला एक शुकपक्षी मनुष्याप्रमाणें हांसल्याचा भास झाला. त्याबरोबर "काय बाबा ! तूं देखील या अवनतीची हांसून हेटाळणीच करतोस काय ! " असे उद्गार साहजिकच मुखावाटे बाहेर पडले. शुकानें उत्तर केलें "वेड्या मनुष्या ! जगाचें रहाटगाडगें कोणत्या दिशेनें फिरत आहे त्याची कल्पना कालाच्या अणुमात्र भागामध्यें वास्तव्य करून किल्यास

जाणाऱ्या तुझ्यासारख्या यःकश्चित् मानवास कितीही विचार केला तरी कधीं येईल काय ! ज्यांनीं या गोष्टींचा पत्ता-लावला ते महात्मे किती थोर होते व त्यांच्या ज्ञानाचें स्वरूप काय होतें याची कल्पना केवळ पोकळ शाब्दिक ज्ञान प्राप्त करून घेऊन केव्हाही होणार नाहीं. घटपटादि चर्पटपंजरीनें जर कांहीं प्रत्यक्ष कार्य जगांत झालें असतें तर कर्मचक्राच्या ऐवजीं शब्दचक्रानेंच काम भागलें असतें. वेड्या, या विषयाचा नुसता विचारच न करितां त्यापासून मनास होणारा बोध अंगीं बाणला पाहिजे व त्याप्रमाणें प्रत्यक्ष आचरण केलें पाहिजे. म्हणजे कालेंकरून त्याची सत्यता प्रत्यक्ष पटून मनुष्याचा उद्धार होईल. ही परंपरा कशा प्रकारें चालत आली याचें शब्दचित्र ऐकण्याची इच्छा असल्यास मी सांगतों, ऐकः—ब्रह्मदेवानें निर्माण केलेल्या त्रिगुणात्मक सृष्टीचा उत्तरोत्तर विकास होऊन प्रस्तुत परिस्थिति निर्माण होई-पर्यंत एवढा मोठा काल गेलेला आहे कीं, मानवी बुद्धीनें रचलेलें अंकगणित देखील त्याचा हिशेब करण्यासाठीं अपुरें पडेल. त्या वेळीं दृश्य सृष्टीची अगदीं प्राथमिक स्थितीपासून सुरवात होऊन पायरीपायरीनें तिची उत्क्रांति होत गेली. पुराणांतरीं सुप्रसिद्ध दशावतारांच्या कथा वर्णन केलेल्या ऐकावयास मिळतात. त्यांच्याच साहाय्यानें या कालाचे भाग करून त्याच्या उत्क्रांतीचें स्वरूप मी तुला थोडक्यांत सांगतों, तें ऐकः—

'मत्स्यावतारावरून जलचर प्राणियुग आणि कूर्मावतारानें जलस्थलचर प्राणियुगाची कल्पना होते. वराहाच्या वेळीं पृथ्वीवर वावरणाऱ्या पश्वादिक प्राण्यांपर्यंत उत्तम तऱ्हेनें उत्क्रांति झालेली असली तरी जलाश्रय थोडा का होईना कायम राहतोच. मानवी प्राणी त्या वेळीं रानटी स्वरूपांत असेल, पण त्याची योग्य कल्पना नारसिंहाच्या स्वरूपावरूनच प्रथम व्यक्त होते. वामन आणि बली हे मानवी प्राण्यांची उत्क्रांति व त्यापूर्वीची त्यांची स्थिति यांचे ठसेच म्हटलें तरी चालेल ! परंतु ही उत्क्रांति परशुरामाच्याही वेळीं पुरी न होतां, रामावताराच्या वेळीं मात्र आपणांस मानवजीविताचा खराखुर

उत्कृष्ट नमुना पहावयास मिळतो. मानवी बुद्धीची सात्विकता याच वेळीं फार उत्कृष्ट रीतीनें पहावयास मिळत असून कृष्णावतारीं तिजमध्यें साम्यबुद्धीची वाढ झालेली दिसून येते. परंतु यापुढें श्रीकृष्णांनीं उपदेशिलेल्या कर्मयोगाचें रहस्य दिवसेंदिवस लोकांना उमजेनासें होऊन दया, क्षमा, शांति वगैरे तत्वांचा उदय होऊन बौद्धावतारानंतरची समाजाची स्थिति क्लिबाप्रमाणें झालेली आढळते. कर्मयोगाचा तो दणदाणितपणा तर नाहींसा झालेलाच होता, पण पुढे जसजसा काळ वाढत गेला तसतशी ज्ञानाच्या खऱ्या स्वरूपाची कल्पना देखील लोकांमध्यें अस्तास जाऊं लागली. आर्यावर्तांत गर्जना करणारा सिंह कोणी न राहिल्यानें, कोल्हेकुई चोहोंकडे ऐकूं येऊं लागली. निरनिराळ्या अहंमन्य नात्यांनीं आत्मपुरस्काराकरितां मूळ संघापासून फुटून निरनिराळ्या सांप्रदायिक मतांचा अनुवाद सुरू केला. समाजाची या कालापासून अवनति होण्यास आरंभ होऊन या नाना मतांच्या गलबल्यामध्यें समाजाच्या ऐक्याचा ऱ्हास होऊं लागला. स्वतंत्र विचाराचा वारा जो पूर्वी प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत खेळत असे, तो बंद होऊन "अंधेनैव नीयमाना यथांधाः" अशी स्थिति झाली, व राजे लोक या सांप्रदायांच्या स्वाधीन झाले. शहाणपणा अगर शौर्य, सद्गुण अगर शुद्ध आचरण हीं अंगीं नसतां जो तो आत्मप्रौढी मिरवूं लागला. फार काय सांगावें, धर्माचें जिवंत स्वरूप तर दूरच राहो, पण मृतशरीराची देखील कल्पना सुटत चालली. भलतेच आचार, भलतेच विचार, भोळेभाबडेपणाच्या भलत्याच कल्पना अस्तित्वांत येऊं लागल्या व समाजाच्या दुर्बल स्थितीमध्यें लोक त्यासच धर्म समजून त्याप्रमाणें आचरण करूं लागले. याप्रमाणें चोहोंकडून अवनतीप्रत पावलेला हा आर्यावर्तामधील जनसमाज जेव्हां पुढें परकी लोकाच्या हल्ल्याखालीं बेजार होऊं लागला, त्या वेळीं त्याची ती स्थिति पाहून खरोखर देवादिकांनीं देखील अश्रु ढाळले असतील ! त्या वेळीं वंशपरंपरेमुळें ज्यांच्या रक्तांत अद्याप शौर्याचा थोडा तरी अंश होता त्यांनीं तोंड देण्याचा प्रयत्न आपल्या हातून होईल तेवढा केला, परंतु राष्ट्र-

पुरुषच ज्या वेळीं हीन स्थितीस पोंचलेला असतो, त्या वेळीं त्याचे एकाकी अवयव त्याचें संरक्षण कसें करूं शकणार ? असें पहा, योग्य विचाराशिवाय आचार होणें शक्य नाहीं, व योग्य आचाराशिवाय बल, शक्ति, तेज, ज्ञान यांची वाढ होणें शक्य नाहीं. ही अलौकिक संपत्ति ज्यांच्याजवळ नाहीं, त्यांच्यावर संकट आलें असतां, कळवळून परमेश्वरास हांक मारण्याची बुद्धि देखील त्यांना होणार नाहीं; व यदाकदाचित् झाली तर स्वतःच्या हातानें तयार केलेल्या नरककुंडांत खितपत पडलेल्या पापात्म्यांकरितां परमेश्वर थोडाच धावून येतो ! आपल्याकडून थोडी तरी योग्यता सिद्ध केल्याशिवाय परमेशाच्या साहाय्याचें पाठबळ आपणांस थोडेंच मिळेल ! याप्रमाणें ही हकीगत आहे असें समज. सद्यःस्थिति तूं जाणतोच आहेस, त्यामध्यें मीं सांगण्यासारखें अधिक तें काय आहे ? तथापि हल्लींच्या समाजामध्यें वावरणाऱ्या भोळ्याभाबड्यांना पुढें होणाऱ्या कलंकी अवताराबद्दल फार आशा वाटत असते. परंतु कलंकीची मदत मिळण्यापूर्वीं नुसत्या स्वस्थ बसण्यानें कदाचित् नाश होणार नाहीं कशावरून ? मित्रा, या गोष्टी अनेक जन्में पाहण्याची संधी मजला मिळाली व त्या स्मरणांत राहिल्या म्हणून तुला त्या आज सांगितल्या. भविष्यत्कालीं काय होणार आहे याची कल्पना मजसारख्या यःकश्चित् विहंगास कोठून येणार ? तथापि, अमर्याद कालांतील अनेक घडामोडींच्या स्वरूपावरून प्रस्तुत युगास मी तमोयुग असें नांव देतों, व कालगणनेप्रमाणें हल्लीं खरोखर कलियुग चालू आहेच. ज्ञानदृष्टि आणि कर्तृत्व यांचा जरी हल्लीं अभाव झालेला दिसतो तथापि पूर्वीं आर्यांच्या पश्चिमेकडे गेलेल्या भाऊबंदांच्या वंशजांनीं तुम्हांस आधिभौतिक कर्मयोगाचे धडे दिले असल्यानें, तुमचें ज्ञान व त्यांचीं कर्में याप्रमाणें दोन्ही अंगांनीं हीन झालेला हा समाज सुदृढ व स्वतंत्र केला पाहिजे. वेड्या ! हिंदुस्थान स्वतंत्र होईल तो दिवस आतां जगाच्या इतिहासांत सोन्याच्या अक्षरांनीं मांडला जाईल यांत संशय नको ! कारण तमोगुणानें व्यापलेल्या या जगताचा उद्धार करण्याचें सामर्थ्य

ज्यामध्यें आहे अशा तऱ्हेचा सनातन आर्यधर्म हिंदुस्थानास मिळालेल्या स्वातंत्र्यानें जेव्हां खराखुरा पुनः जिवंत होईल, तेव्हां तो जगाचें तमोगुणाचें स्वरूप पालटून त्यास सत्वगुणी बनविल्याशिवाय रहाणार नाहीं! अशा रीतीनें जगास जर या अलौकिक औषधाचा उपाय केला गेला तर या ब्रह्मांड-सृष्टीचें स्वरूप सर्व तऱ्हेनें पालटल्याशिवाय राहणार नाहीं. निदान हिंदुस्थानचें हित ज्यांनीं आपल्या हृदयाशीं धरलेलें आहे, त्यांनीं ही गोष्ट विसरतां कामा नये. प्रथम समाज सुसंघटित व सशक्त बनविला पाहिजे. म्हणजे त्यास स्वातंत्र्य मिळेल. स्वातंत्र्याचा उपयोग पृथ्वीवरील मानवजातीचा उद्धार करण्याकडे केल्यानें त्यांत स्वतःचा उद्धार आपोआपच होणार आहे. गृहस्था, या माझ्या आशावादीपणाच्या कल्पना आहेत, पण दैवयोगानें जर त्या सत्य झाल्या, तर त्यांमध्यें मला व जगाला कलंकी अवताराचें कार्य पहावयास मिळेल, असें माझी मनोदेवता मला सांगते. परमेश्वरी इच्छा काय आहे हें थोडेंच कोणास आगाऊ कळणार आहे!"

"एवढें मात्र खरें कीं, मानवी जीविताचा तो साधेपणा मात्र जो एकदां गेला तो गेला. पूर्वीं एका कुटुंबाचा संसार सुखानें चालण्यास फार थोड्या वस्तूंची जरूरी लागे, पण हल्लींची गोष्ट तशी नाहीं. जेवढा व्याप तेवढा संताप मागें ठेवलेलाच आहे. आणि या संतापांतच सर्व जन्म निघून गेल्यावर त्या संसारापासून फायदा तो काय? पूर्वींच्या कालांतील त्या गोष्टी आतां अगदीं विलक्षणच वाटतील. त्या काळीं जो तो आपापल्या जातिधर्माप्रमाणें वागून समाजाच्या प्रत्येक अंगास बळकटी आणीत असे. जातिजातींच्या व्यवसायामध्यें वंशपरंपरेनें कलांचा अधिकाधिक उत्कर्ष होई. राजे लोक प्रजेच्या हिताविषयीं दक्ष असत. अन्यायाचरण करण्याकडे त्या वेळीं प्रवृत्ति नसल्यानें बहुजनसमाजामध्यें एक तऱ्हेचें बंधुप्रेम वसत असे. पापाचरण होत नसल्यानें पंचमहाभूतें आपापलीं कामें चोख रीतीनें बजावीत असत. समुद्र, नद्या, पर्वत, सरोवरें, उद्यानें यांवर पावित्र्याची

एक तऱ्हेची रोषनाई खुलून दिसत असे. धान्यांनीं लवलेलीं पिकें, फळांनीं गजबजलेलीं फळझाडें, गर्द पालवीनें दाटलेले व पक्ष्यांनीं गजबजलेले वृक्ष, वनश्रीनें शोभायमान झालेले पर्वत, अमृततुल्य जलांनीं तुडुंब भरलेल्या नद्या व जलाशय, नानातऱ्हेच्या श्वापदांनीं आडविलेलीं वनें, पुण्यकर्मांनीं निनादित झालेले पवित्र आश्रम व गुरुकुलें, ऐश्वर्य आणि संपत्ति व त्याचप्रमाणें सद्‌गुणी व सदाचारी नागरिक यांनीं फुललेल्या नगरी, मदानें उन्मत्त झाल्यामुळें युद्धास आतुर झालेले पण सन्मार्गगामी सैनिक, अशा एक ना दोन हजारों गोष्टी गगनविहार करतांना त्या वेळीं आम्हांस दिसत व त्या नयनमनोहर देखाव्यानें मनास कसा आल्हाद होई! या दृश्याप्रमाणेंच पुढें दांभिक धर्मप्रचार अमलांत येऊं लागला, त्या वेळीं लोकांची कशी फसवणूक होई व समाजाच्या अवनतीची एकेक कला कशी वाढत जाई तेंही मीं पाहिलें आहे! हिंदुस्थानावर परकीयांचे हल्ले होत असत, त्या वेळीं एतद्देशीय कमकुवत व कौशल्यहीन देशद्रोह्यांनीं त्यांना मदत केलेली पाहून मजला राग यावा. छातीचा कोट करून ज्या वेळीं भारतवर्षांतील सैनिक परकीयांच्या टोळधाडीस तोंड देण्यास निरत, त्या वेळीं कौतुकानें अंतःकरणास भरती यावी, परंतु त्यांचा नाश झालेला पाहून डोळ्यांतून दुःखाश्रूंचा पूर यावा! पुढें त्या विधर्मी लोकांनीं, सनातन धर्माचा नायनाट होण्याकरितां स्वधर्माचा जुलमानें प्रसार करावा त्या वेळच्या त्या देखाव्यानें मला वाटतें सर्व स्थिरचर सृष्टीच्या अंगावर रोमांच उभे रहावेत! भारतभूमीला आर्यांनीं उन्नतावस्थेस आणल्यामुळें त्यांच्या वंशजांवर लाडक्या मुलाप्रमाणें तिचें प्रेम सदैव असे. परंतु त्यांच्यावरच संकटपरंपरा कोसळल्यामुळें झालेली तिची दीनावस्था व विटंबना कोणास पहावेना! मेंढरांच्या दावणीच्या दावणी ज्याप्रमाणें कसाई लोक सुरीस बळी देतात, त्याप्रमाणें निर्बळ व हतबुद्ध झालेल्या आर्यपुत्रांना परकीयांच्या तरवारींना बळी पडतांना पाहिलें म्हणजे गगनविहार करतां

करतां भोंवळ यावी ! परंतु या सर्वांचा थोडा कां होईना वचपा महाराष्ट्रा-मध्यें एक महान् पुरुष निर्माण होऊन पुढें निघाला. त्या वेळीं प्रस्थापित होणाऱ्या रामउपासनेच्या योगानें देशाची स्थिति बरीच सुधारली. परंतु देशाचें दुर्दैव अद्याप संपलेलें नव्हतें. त्या महाराष्ट्रसाम्राज्यामध्यें त्यामुळें अनेक फंदफितुरी होऊन आर्यावर्त फिरून पूर्वीच्याच नव्हे पण दुसऱ्या परकीय लोकांच्या सत्तेखालीं गेला. ”

“ प्रिय मित्रा ! आर्यधर्माचा पाया केवढा खंबीर; पण खोट्या मोठेपणाच्या नादीं त्याचे अनुयायी लागल्यामुळें सर्वांत फाटाफूट झाली. जो धर्मराज सर्व जगास एकवटण्यास समर्थ झाला असता त्याची अशी अनास्था होऊन आजकाल तो कालराहूनें ग्रस्त केलेल्या दिनमणिप्रमाणें दीन झाला आहे ! परकीय सत्तेनें घातलेल्या अंजनानें बहुजनसमाजाचे नेत्र जरी आतां उजळत चालले आहेत, तथापि धर्माचें रहस्य अंगीं बाणून घेण्याचा प्रयत्न समाजा-कडून होत नाहीं. ज्या गोष्टींनीं अगर आचरणानें समाज भीरु व हतबुद्ध झालेला आहे, त्या सोडून देऊन समाजाच्या सर्व घटकावयवांनीं स्वतंत्र, सुसंघटित व सामर्थ्यवान् बनलें पाहिजे. घटकावयव आत्मस्वातंत्र्यानें साम-र्थ्यवान् व ज्ञानी बनले म्हणजे समाजास स्वातंत्र्य मुद्दाम दुसरीकडून कोणीं आणून द्यावें लागत नाहीं; तो स्वयंसिद्धच स्वतंत्र असतो. त्याच्या पार-तंत्र्याच्या बेड्या आपोआप गळून पडतात; अथवा ती स्वातंत्र्यप्रवृत्ति पर-कीय सत्तेस सहन न झाल्यामुळें निरुपायानें त्यांना त्यांस स्वातंत्र्याचा हक्क देणें भाग पडतें. अशा तऱ्हेनें तयार झालेला समाज केवळ स्वतःचेंच पार-तंत्र्य नाहींसें करतो एवढेंच नाहीं, तर मनांत आणील तर जगामध्यें पार-तंत्र्याचा मागमूस देखील तो उरूं देणार नाहीं. सुमित्रा ! याप्रमाणें ही कर्म-कथा आहे. ती सुफळ होईल किंवा कशी हें एकटा भविष्यत्कालच दाखवूं शकेल ! ”

शुकाचें तें शहाणपणाचें भाषण व तो मुत्सद्दीपणा ऐकून आम्ही तर

3463

थकच झालों. हा एवढा ज्ञाता शुक अनादिकालापासून माहिती सांगतो व मानवी प्राण्याप्रमाणें वादविवाद करतो. अर्थात् हा कोणी तरी महात्मा आपल्या कृतकर्मांचें फल भोगण्याकरितां शुकयोनीप्रत गेला असावा, अशी कल्पना मनांत येऊन आम्हीं त्यास विचारलें–" भाग्यवंता शुका, तूं पक्षी असून तुला देखील हें ज्ञान आहे. दुर्दैव आमच्या आर्यभूचें, कीं तुला शुकयोनीमध्यें वास करावा लागला आहे ! आपला पूर्व इतिहास आम्हांस कळवून आपली ओळख तूं करवून देशील तर आम्ही धन्य होऊं." वरील प्रश्न ऐकतांच तो शुक पुनः एकदा मोठ्यानें हंसला, त्यानें आपली मान थोडी उंच केली, पंख फडफडविले आणि एकवार आम्हांकडे नजर टाकून, त्यानें जी भरारी मारली, त्याबरोबर तो निमिषार्धांत आकाशाच्या अनंत अवकाशांत नाहींसा झाला ! आम्हांसही तो अशा रीतीनें नाहींसा झाल्यानें फार विस्मय वाटला !

त्या शुकानें प्रदर्शित केलेले आपले विचार प्रत्येक सुज्ञ मनुष्यास पटण्यासारखेच आहेत. त्यापेक्षां जास्त आम्ही काय सांगूं शकणार ? समाजामध्यें पसरलेल्या नाना मतांच्या बंडाळ्यांनीं समाजाची फूट झाली. खरा धर्म बाजूस राहून धर्माची वाताहत झाली. समाजाच्या विचारशक्तीवर पाणी ओतलें गेल्यानें दांभिक लोकांच्या नुकसानकारक आचारविचारांचा फैलाव झाला. समाजास अंधत्व आल्यानें, 'कान गेले व भोकें राहिलीं' अशी स्थिति झाली. याप्रमाणें एकादा समाज अवनतीच्या गर्तेमध्यें एकदा कोसळूं लागल्यावर त्यास अडवून धरण्याचें सामर्थ्य कोणामध्यें असणार ? प्रवृत्ति सोडून निवृत्तीच्या पाठीमागें एकदा समाज लागल्यावर दिवसेंदिवस त्या निवृत्तीमधीलही जिवंतपणा गेल्यानें एकाद्या मृत देहाप्रमाणें विकार, विचार व शक्ति हीं त्यांतून नाहींशीं होऊन गतानुगतिकत्वाच्या तत्वानें त्याचे सर्व व्यवहार चालूं लागले. त्यांतच शत्रूंनीं बेजार केल्यावर त्याच्या हालअपेष्टांस सीमाच राहिली नाहीं ! कर्तृत्व व स्वाभिमान यांचा नाश होऊन परक्याची

थुंकी झेलण्यांत अभिमान वाटूं लागला ! फार काय, पण चीड येण्यासारखे प्रकार प्रत्यहीं घडत असतां, विरोधाऐवजीं त्यांस मदत करण्यामध्यें लोकांना एक प्रकारची बहादुरकी वाटूं लागली. देशाकरितां प्राण देण्याची घडाडी नाहींशी होऊन स्वतःच्या प्राणांकरितां देशाचा बळी देण्यांत नीचपणा वाटेनासा झाला !

याप्रमाणें सर्व देश चोहोंकडून ग्रस्त झाल्यावेळीं शिवाजीमहाराजांसारखा अद्वितीय पुरुष महाराष्ट्रांत उत्पन्न होऊन मराठी साम्राज्याच्या स्थापनेनें या हीन स्थितीतून आर्यावर्ताच्या कांहीं भागाची सुटका व्हावी हें त्या लोकांचें भाग्य होय ! परंतु अवनतीस लागलेल्या समाजाची सुधारणा पूर्णपणें झाली नाहीं तर ज्या आगंतुक कारणांमुळें त्यास चांगले दिवस दिसतात तें नाहींसें झाल्याबरोबर त्याची पहिली गति त्यास पुनः प्राप्त व्हावी यांत नवल नाहीं. श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांनीं आजन्म पाळिलेलें ' मराठा तितुका मेळवावा ' हें तत्व कोणीकडेच राहून पेशवाईच्या उत्तरकालीं जी पेशवे व इतर सर्व मराठे सरदार यांमध्यें फाटाफूट झाली, तींमुळें मराठी साम्राज्य एवढें बलिष्ठ असूनही, एवढ्याशा ईस्ट इंडिया कंपनीच्या कारवाईस कसें बळी पडलें त्याचें विस्मयकारक चित्र आपल्या डोळ्यापुढें अगदीं ताजें आहे. स्वधर्माच्या उठलेल्या लाटेनें जरी तत्कालीन पिढीवर अगर पुढें कांहीं पिढ्या आपला परिणाम केला, तरी फार दिवसांच्या मुरलेल्या अवनतीच्या नीतिमत्तेनें समाजास पुनः एकदां जखडून त्याचा नाश केला यांत नवल नाहीं.

याप्रमाणें हा मध्यम कालचा, मनास उदास करणारा, आर्यावर्तास आणि सनातन आर्यधर्मास खरीखुरी काळोखी आणणाऱ्या गोष्टींचा इतिहास आहे !

[library stamp]

# ( ३ ) भारतवर्षांतील काळोख.

मराठे व इंग्रज यांच्या ज्यावेळच्या चकमकी झाल्या त्या कालापासून तर हिंदुस्थानांतील जनसमाजांतील जिवंतपणा अजिबात् नष्ट झाला. दुसऱ्याचा नाश होत असलेला आपण स्वस्थ बसून पहावा व आपला नाश असाच उद्यां होईल किंवा काय या भीतीनें मनांत चूर असावें. मनुष्यबल नाहीं, संपत्ति नाहीं, शौर्य व धडाडी नाहीं, अशा स्थितीमध्यें स्वसंरक्षणाचा प्रश्न शत्रूस सामील होऊन देशद्रोह करण्यानें सोडवावा, तों उद्यां देशाचा नाश तर होतोच, पण त्यानंतर त्या देशद्रोह्यासमुद्धां मित्र केलेला शत्रु सोडीत नाहीं! अशी फसवणूक कित्येकांची झाली! त्या वेळेपर्यंत मराठी साम्राज्य अगर त्यापूर्वीं मुसलमानी सत्ता असल्यावेळीं, प्रजा म्हणजे काय व राजा कोणास म्हणतात हें तरी लोकांस कळत असे व प्रत्यक्ष दिसत असे. परंतु कुटिल नीतीचा आश्रय करून घात करणाऱ्या या नव्या विधर्मी परकीयांच्या वेळीं राजाची, प्रजेची अगर धर्माची कोणत्याच प्रकारची जाणीव समाजाच्या अंतःकरणास पटेना. राजा म्हणावें तर राजेपण नाहीं, राजधानीही नाहीं. मद्रासेस इंग्रज आहे, तर मुंबईसही आहे, त्याचप्रमाणें कलकत्यासही तो दिसतो. एकानें आगळीक केली तर दुसऱ्याकडे दाद मागावी म्हटलें, तर एकापेक्षां दुसरा जास्त गिळूं पाहतो. एतद्देशीय शत्रूबरोबर लढाई मारण्यासाठीं मदत देण्यास तो आज तयार होतो, तर उद्यां त्याच्या बाजूनें लढण्यासही कमी करीत नाहीं! सरदार असो, राजा असो, सम्राट् असो, यास सर्व सारखे असून, कोणाचे लचके तोडतां येतील याविषयीं सदैव टपून बसलेला! खुद्द त्याच्या राजाकडे दाद मागावी म्हटलें तर सातसमुद्रांपलिकडे गेलेल्या वकीलांचा सातसात वर्षे पत्ता नाहीं. राक्षसांच्या मायावीपणाच्या ज्या कथा आपण ऐकतों त्यांचें प्रत्यक्ष उदाहरण त्या जुन्या काळच्या श्रद्धावान लोकांस खरोखरीच पहावयास मिळून ते गुंग झाले असतील. याप्रमाणें हळूहळू या आर्य-

वर्तांचा घास इंग्रजांच्या गळीं शेवटीं उतरला गेला. परंतु जनसमाज याप्रमाणें हतबुद्ध व निर्वीर्य झालेला असला तरी ज्यांच्या साहाय्यानें हिंदुस्थानचें अजिंक्यपत्र इंग्रजांनीं मिळविलें, त्या नेटिव्ह शिपायांना त्यांनीं केलेल्या साहाय्याचा प्रत्यक्ष परिणाम काय झाला तें कळून चुकल्याशिवाय राहिलें नाहीं. आपल्या हातानें आपल्या घरावर निखारा ठेवून त्याचा आपण नाश केला, ही गोष्ट त्यांना जेव्हां टोचूं लागली, त्या वेळीं त्यांच्या त्या निधड्या छातीच्या आंत दडून बसलेल्या स्वाभिमानानें व शौर्यानें तावडतोब उचल खाल्ली. परंतु त्यांचा तो प्रयत्न म्हणजे, मरावयास घातलेल्या शरीराच्या शेवटच्या झटक्याप्रमाणें विफल होता. देशाचा अभिमान सोडून केवळ पोटासाठीं स्वदेशद्रोह त्यांनीं पतकरला व सर्व हिंदुस्थानावर नांगर फिरविला. त्याचा परिणाम ज्या वेळीं त्यांच्या डोळ्यांस स्पष्ट दिसूं लागला, त्या वेळीं कांहीं अंशीं पश्चात्तापानें म्हणा किंवा निरुपाय म्हणून आततायीपणानें अगर माथेफिरू बनल्यानें म्हणा, अविचाराचा प्रयत्न यशस्वी झाला नाहीं ही गोष्ट वेगळी. परंतु त्यावरून एवढी गोष्ट मात्र चांगलीच कळून येते ती ही कीं, इंग्रजी सत्तेचा प्रसार हिंदुस्थानांत इतक्या झपाट्यानें झाला, त्यास कारण म्हणजे त्या वेळच्या लोकांमध्यें शौर्याचा अभाव होता हें खास नव्हे. सर्व बाजूंनीं विस्कळित झालेल्या या हिंदी राष्ट्राच्या पाठीमागें पद्धतशीरपणानें उपयोगांत आणलेलें कुटिल कारस्थानाचें जाळें या सर्वनाशाच्या मुळाशीं आहे.

१८५७ सालच्या बंडानंतर बराच कालपर्यंत हिंदी राष्ट्रपुरुष मस्तकावर झालेल्या पारतंत्र्याच्या आघातामुळें जवळजवळ बेशुद्ध स्थितींतच होता म्हटलें तरी चालेल. पूर्वीं होतें काय, हल्लीं झालें काय व तें कसें झालें याबद्दल बहुजनसमाजास उमज पडेना. त्या वेळीं स्वातंत्र्यदेवीचा काल झाल्यामुळें सर्व समाज सुतकी व बापुडवाणा दिसत असेल. पूर्वींच्या राज्यांतील त्या समजणाऱ्या गोष्टी व घडामोडी या लोकांच्या सरावांतल्या होत्या व त्यांत त्यांना एकप्रकारचा आपलेपणा वाटे. परंतु ही नंतरची स्थिति

म्हणजे जुनें गेलें, व नवीन आलें तें उमजेना, अशी झाली असेल. जुन्याचा वाली कोणी उरला नाहीं, तेथें नव्यास विरोध करण्याची बुद्धि तरी कोणास कशी होणार ? एकामागून एक सुरू असलेल्या सुधारणांकडे बावळेपणानें पहावें व मनास आल्यास त्याबद्दल इंग्रजाची स्तुति करावी. त्यांजकडून जुलूम झाल्यास, हा नवा कायदा म्हणून सहन करावा किंवा फार फार झालें तर इंग्रजाच्या नांवानें बोटें मोडावींत. खरोखर ते भोळेभावडे जुन्या पद्धतीचे हतबुद्ध झालेले लोक व ही नवी इंग्रजी मारवाडी सत्ता या दोहोंचें संगमचित्र काय स्वरूपाचें असेल व ती स्थिति कशी दीनवाणी असेल याची कल्पना करवत नाहीं.

त्यानंतर इंग्रजांनीं आपल्या या नवीन मिळविलेल्या साम्राज्यास धोका पोंचूं नये म्हणून एकेक नव्या नव्या तजविजी आरंभल्या असतील. एकोणीसावें शतक इंग्रजी इतिहासांत देखील यांत्रिक शोधांच्या उगमाबद्दल प्रसिद्ध आहे. त्या शोधांचे परिणाम या आमच्या जुन्या लोकांस जेव्हां दिसले असतील, त्या वेळीं इंग्रजांच्या शहाणपणाबद्दल त्यांना मोठें नवल वाटलें असेल. परंतु त्या बिचाऱ्या भोळया लोकांना इंग्रजांनीं आपली सत्ता हिंदुस्थानांत कां प्रस्थापित केली त्याची कल्पना तरी कोठून येणार ? त्यांना असें वाटलें असेल कीं, पृथ्वीराज चव्हाणास पराभूत करून ज्याप्रमाणें दिल्लीचें राज्य मुसलमानांनीं घेतलें, किंवा त्यापासून पुढे तें मराठ्यांनीं घेतलें, त्याप्रमाणें एकानें दुसऱ्याचें राज्य घेण्यापैकीच ही कांहींतरी गोष्ट असावी. तासीं तीस मैल वेगानें चालणारी आगगाडी सुरू झाली त्या वेळीं लोकांस वाटलें कीं, बरें झाल, थोडक्या दगदगीनें ताबडतोब इकडून तिकडे जाण्याची सोय झाली. तारायंत्रानें ज्या वेळीं अर्ध्या तासांत इकडून तिकडे निरोप पोंचविण्याची सोय झाली, त्या वेळीं जो तो इंग्रजाचे आभार मानूं लागला असेल. परंतु त्यांना हें काय माहीत कीं, राज्य घेण्याची पश्चिमेकडील इंग्रजाची कल्पना पूर्वेकडील मोंगल अगर मराठे यांच्यासारखी साधेपणाची

नाहीं. त्यांनीं जे जे परोपकार केलेले दिसतात ते प्रजेच्या हिताकरितांच केवळ आहेत, असें दिसलें तरी प्रजेस बांधून टाकण्याचीही शक्ति त्यांजमध्यें आहे हें त्या बिचाऱ्यांना कसें उमगणार ? वार्षिक उत्पन्नाचा व खर्चाचा पैन पै जमाखर्च लोकांस दाखवून इंग्रज उलट असें म्हणाला असेल कीं, एवढा त्रास सोसून एक दिडकीही न घेतां तुमच्या हिताकरितां आम्ही वर्षभर झटलों ! परंतु या परोपकारीपणाचा खरा कावा कोठें आहे हें लोकांना कसें कळणार ? लोक म्हणाले, बरें झालें ! इंग्रजांचा अम्मल आल्यापासून काठीस सोनें बांधून-काशीपासून रामेश्वरापर्यंत एकटें फिरलें तरी आतां धोका राहिलेला नाहीं ! परंतु काठीस बांधावयास सोनें लोकांजवळ राहूं देण्याचा विचार इंग्रजाचा नाहीं ही गोष्ट त्यांना कशी माहीती पडणार ?

इंग्रजी शिक्षणाचा फैलाव जसजसा होऊं लागला, तसतसा समाजावर एक तऱ्हेचा निराळाच परिणाम होऊं लागला. इंग्रजी शिक्षणाचा शिक्का ज्यांस मिळेल त्यांना त्यांत मोठी धन्यता वाटूं लागली. त्यांतल्या त्यांत विलायतेहून प्राणी जाऊन आला म्हणजे काशीरामेश्वराची यात्रा झाल्यानें देखील वाटणार नाहीं एवढी धन्यता त्यांत वाटूं लागली. तिकडून जाऊन आल्यावर अभक्ष्यभक्षण व अपेयपानामध्यें एक प्रकारचा पुरुषार्थ वाटूं लागला. हिंदुधर्म म्हणजे एक रानटी लोकांचा धर्म व हिंदु म्हणजे एक काळा आदमी, अशी भावना स्वकीयांबद्दल व स्वधर्माबद्दल होऊं लागली. बंडी घातलेला व शेंडी ठेवलेला पुरुष पाहिला म्हणजे त्याजबद्दल त्यांना तिरस्कार वाटूं लागला. परंतु ते स्वतः बंडी घालीत नाहींत व शेंडी ठेवीत नाहींत एवढ्यानेंच त्यांच्यामध्यें काय जास्त फरक होऊं शकतो हें त्यांचें त्यांनाच समजत नव्हतें. त्या अमदानींत या प्रकारचे लोक ज्याप्रमाणें निपजले त्याप्रमाणें इंग्रजी शिक्षणाच्या वाघिणीचें दूध पिऊन खरोखर मर्द बनलेले लोक देखील उदयास येऊं लागले. त्या असहाय स्थितीमध्यें जरी त्यांच्या पराक्रमाचें तेजोवलय कांहीं अंशीं मर्यादित स्वरूपाचें राहिलें असलें, तरी त्यास त्यांचा

उपाय नव्हता. कारण सर्व तऱ्हेनें दुबल झालेल्या समाजाच्या अंगांत शक्ति भरविण्याचें काम कांहीं थोड्या व्यक्तींचें अगर थोडक्या कालावधींत साधणारें नसतें. ज्या समाजास ज्ञान नाहीं, शौर्य नाहीं, शक्ति नाहीं, शस्त्रें धारण करण्याची परवानगी नाहीं, एकी नाहीं व कोणत्याही तऱ्हेचा प्रयत्न एकसारखा नेटानें चालू ठेवण्याइतकी चिकाटी, हौस अगर उत्साह नाहीं, त्यास उन्नतावस्थेस आणण्याचें काम फार कठीण आहे. त्यांत त्यांच्या मार्गांत किती तरी अडथळे यावयाचे ! मनुष्यबल मिळणें कठीण व त्यास त्यांस जरूर असलेल्या संपदाबलाचीही वाण. कोणत्याही तऱ्हेचा प्रयत्न करावा म्हटलें तर डोळ्यांत तेल घालून दक्षतेनें नजर लावून बसलेल्या आमच्या 'मा बापांस' त्यामध्यें अराजनिष्ठेचा वास यावा ! त्यानंतर ब्राह्मण–ब्राह्मणेतर अथवा हिंदु–मुसलमान अशा निरनिराळ्या अडचणी उद्भवल्या. त्या निराळयाच शिक्षणाच्या फैलावामुळें हिंदुस्थानांत पसरलेल्या अठरा पगड जातींमध्यें जागृतता उत्पन्न होऊन नानाप्रकारच्या चळवळी सुरू झाल्या. परंतु या चळवळींचा उपयोग स्वजातीच्या उत्क्रांतीकडे करण्याऐवजीं दुसऱ्या जातीशीं झगडण्याकडे होऊं लागला. त्यामध्यें अस्पृश्य हिंदुसमाजास एकीकडून ख्रिस्ती व दुसरीकडून इस्लामधर्म आपापल्या गोटांत सामील करून घेण्यासाठीं सतावूं लागला. व त्यांनाही हिंदुधर्मापेक्षां या दुसऱ्या दोन धर्मांत आपणांस चांगला आश्रय मिळेलसें वाटल्यानें अस्पृश्याचा ख्रिस्ती किंवा मुसलमान बनून तो 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' होऊं लागला. परदेशी मालानें बाजार भरून गेल्यानें एतद्देशीय कारखाने व कला ठार बुडाल्या. दिवसेंदिवस लोकांच्या संपत्तीस ओहटी लागून लोक श्रीमंताचे भिकारी बनत चालले. एतद्देशीय मालाची परदेशीं वहातुक सुरू झाल्यामुळें लोकांस खावयास अन्न मिळेनासें झालें. परदेशी मालाचा खप फार होऊं लागल्यानें जो पैसा आपल्या देशांत राहिला असता तो घराबाहेर जाऊं लागला. लोकांच्या गरजा व चैन वाढली; व त्यांना दुजोरा देण्यासाठीं,

हलक्या किंमतीचा नकली माल लोक घेऊं लागल्यामुळें, घटोत्कचाच्या मायाबाजाराप्रमाणें प्रत्येक कुटुंबाचा संसार कवडी मोलाचा पण दिसण्यांत विलासी असा होऊं लागला. पैसा मिळविण्याकरितां रक्ताचा घाम लोक गाळूं लागले, पण तो मिळालेला पैसा या घटोत्कचाच्या मायेमुळें कोणा-जवळही टिकेना. लोकांची शारीरिक व सांपत्तिक स्थिति हलाखीची होऊन अकालीं मृत्यूमुळें विधवा स्त्रियांची संख्या वाढली. मुलांच्या मृत्युसंख्येची वाढही याचप्रमाणें जास्त होऊं लागून नानातऱ्हेचे रोग लोकांमध्यें झपा-ट्यानें वाढूं लागले. व्यापारी घरीं बसले, शेतकरी ठार बुडाले, गुरेंढोरें हीनावस्थेस पोंचलीं, नकलीपणा वाढला, मनुष्यामध्यें त्राण उरला नाहीं, अशी स्थिति झाली तरी स्वकीयांमध्यें कलह करण्याची प्रवृत्ति जी एक-सारखी वाढत आहे ती कमी होत नाहीं! धर्माविषयींचें ज्ञान राहिलेंच, पण अज्ञान मात्र वाढलें. सद्गुण जाऊन दुर्गुणांची वाढ झाली. संपत्ति गेली व दारिद्य आलें! शौर्य आणि पराक्रम हीं लयास जाऊन भित्रेपणानें लोकांस पछाडलें. ठोशास ठोसा लगावण्याची प्रवृत्ति जाऊन आपल्यास ठोसा लगावणारासच 'कॉवर्ड' म्हणून हात चोळीत बसण्याची निवृत्ति वाढली. देशाकरितां प्राण देण्याची मर्दुमकी गेली आणि स्वतःचा प्राण राखून देशकार्य करण्यांत दूरदर्शीपणा आहे, असें लोकपुढारी सांगूं लागले. दूरवर नजर पोंचेनाशी होऊन आजउद्यांच्या गोष्टीच लोक बोलूं लागले. मुत्सद्दीपणा व कारस्थान यांचा लोप होऊन मर्यादित स्वरूपाच्या कारभारा-मध्येंच लोक लक्ष्य घालूं लागले. राष्ट्रीय सभा झाली, महायुद्ध झालें, सुधा-रणा–कायद्याच्या सुधारणांचा अंमल होऊं लागला, तसतशी समाजाच्या राजकारणाची मर्यादा छाटली गेली. ज्या वेळीं राष्ट्रीयसभा नव्हती त्या वेळीं राजकारणास मर्यादा नसे. लोकपुढाऱ्यांस आपल्या मुत्सद्दीपणाचा उपयोग, वाटेल तेवढी लांबवर नजर ठेवून त्याप्रमाणें योजना आंखण्याकडे करतां येण्यासारखा होता. राष्ट्रीयसभा निघाल्यावर स्वराज्य हें ध्येय झालें

[stamp]

व राष्ट्रीयसभेचे ठराव हे त्या ध्येयाचें साधन उत्पन्न झालें. सुधारणा–कायदा अमलांत आल्यावर स्वराज्य थोडें मागें पडलें व लोकांच्या नजरेपुढें कौंसिल हा एकच प्रश्न प्रामुख्यानें उभा राहिला. त्यानंतर सायमन कमिशन आलें, कीं वातावरण कमिशनच्याच प्रश्नानें खळबळून गेलें. कमिशन येईल व जाईल, आणि पार्लमेंटनें ठरविल्याप्रमाणें सुधारणा–कायद्यांत थोडी सुधारणा होऊन त्याची व्याप्ति थोडी अधिक अगर कमी करण्यांत येऊन नवीन कायद्याचा अम्मल होऊं लागेल, त्या वेळीं लोकांचें लक्ष्य या नव्या सुधारणांच्या जन्माकडे वेघलें जाईल. एवंच, कांहीं झालें तरी या मर्यादित स्वरूपाच्या प्रश्नाचा काथ्याकूट करण्याकडे हल्लीं होत आहे त्याचप्रमाणें पुढाऱ्यांच्या मुत्सद्दीपणाचा व्यय होणार हें खास.

परंतु थोडी बाहेरच्या बाजूस नजर टाकली असतां साधारण मनुष्यास काय दिसतें त्याकडे कोणी लक्ष देत नाहीं. सायमन कमिशनवर कडक बहिष्कार टाकण्यांत आला तरी सरकारच्या प्रयत्नानें 'जी हुकूम' वाले लोक मिळतात ते कां ? खुद्द राष्ट्रिय सभेमध्यें देखील देशास सर्व तऱ्हेनें हितकारक अशा तऱ्हेचा प्रश्न निघाला म्हणजे नानामतांचा गलबला होतो तो कां ? कमिशनवरील बहिष्काराचा ठराव पास केल्याबरोबर तो एकसारखा चालूं राहील किंवा नाहीं याबद्दल धाकधुक कां वाटते ? नेमस्त लोक जरी या बहिष्काराघुरते आपली नेहमींची मागची जागा ओलांडून थोडे पुढें आले, तरी राष्ट्रियपक्षाशीं एकमतानें ते सर्वस्वीं संलग्न कां होत नाहींत ? एवढेंच नाहीं तर सर्व पक्षांच्या नांवानें तयार होत असलेल्या नवीन सुधारणांच्या मसुद्याचा खल चालला असतां, 'सिंधप्रांतच सोडून द्या, तर संयुक्त मतदार संघास आम्ही मंजुरी देतों,'' वगैरे मागण्यांचा हट्ट धरून विहिरींच्या रुसल्याचा देखावा मुसलमान लोक दाखवितात तो कां ? राष्ट्रियसभेनें मद्रास येथें विकारांस बळी पडून जरी स्वातंत्र्याचा ठराव पास केला, तरी 'तो नुसता ठरावच होता; ध्येयामध्यें त्यायोगानें कांहींएक फरक झालेला नाहीं' वगैरे

खारवण मागाहून मित्रेशणानें सारविण्यांत येतें तें कां ? त्याचप्रमाणें ठराव स्वातंत्र्याचा, पण तदनुसार प्रयत्न करतांना मात्र निःशस्त्रतेची अट घालण्यांत येते ती कां ? स्वातंत्र्य राखणें जर शस्त्राशिवाय होत नाहीं, तर तें मिळविण्याचा प्रयत्न निःशस्त्रतेनें केल्यास शस्त्रानें स्वातंत्र्य राखण्याचें जोखमीचें काम कोण करणार ? शिवाय जे आधींच निःशस्त्र आहेत, त्यांना आणखी हीच अट पुढें घालून जास्त नामर्द बनविलें तर त्या तसल्या स्थितीमध्यें तें स्वातंत्र्य काय उपयोगाचें ? स्वतंत्र तऱ्हेनें चाललेले प्रयत्न जर निःशस्त्रतेनें करावयाचे तर स्कीन कमिटीच्या सूचना नामंजुर झाल्या म्हणून त्यांत वाईट तें काय झालें ? सायमन कामिशन हिंदुस्थानांत ' जी हुकम्यांच्या ' कां होईना मेजवान्या झोडीत चोहोंकडे वावरलें, पण इजिप्त देशांत पाऊल टाकून देखील, मिल्नर कमिशनला विद्यार्थिवर्गाच्या चळवळीमुळें समुद्राचा आश्रय पुनः घ्यावा लागला ! मुंबईला मात्र विद्यार्थिवर्गास सार्जेटच्या हातचे लाठीचे तडाखे खावे लागले. इजिप्तची एवढी तयारी असूनही त्यास तकलुपी इंडिपेंडन्स देण्यांत आलें व तेंही आतां कमी कमी करण्याचे प्रयत्न चालू आहेत, मग दुबळ्या हिंदुस्थानास काय मिळेल याची कल्पनाच करावयास नको ! स्वराज्य मिळविण्याचा प्रयत्न करणें हें ज्याप्रमाणें पुढाऱ्यांचें कर्तव्य असतें, त्याप्रमाणेंच किंबहुना त्याहून अधिक महत्वाचें कर्तव्य म्हणजे स्वराज्यास योग्य अशी लायखी बहुजनसमाजामध्यें त्यांनीं प्रथम उत्पन्न करणें हें होय. बहुजनसमाज दणदणीत असेल, तर त्याचे पुढारी दणदणीत असतील व त्यांजकडून निकडीचे प्रयत्न तरी करण्यांत येतील. लोक आणि पुढारी यांचा हा कार्यकारणभावसंबंध आज किती पुढारी आचरणांत आणीत आहेत ! राष्ट्राच्या राजकारणाचें स्वरूप वर सांगितल्याप्रमाणें, राष्ट्रिय सभा अगर कौन्सिलें यांनीं मर्यादित झालेलें नसतें, तर लो. टिळकांप्रमाणें सर्व पुढारी प्रथम बहुजनसमाजाची शक्ति वाढविण्याकडे गुंतले असते. गेलीं सहा वर्षें कौंसिलचीं चिपाडें चोखून एक वेलाभर

रस देखील घशाखालीं उतरला नसेल, पण तेवढ्या अवधींत पुढारी लोक मनावर घेते तर लोकसमाजाचा किती तरी फायदा झाला असता. यावरून कौंसिलाचा प्रश्न अजिबात सोडून द्यावा असा कोणीं गैरसमज करून घेऊं नये. पुढें आलेलें यांत्रिक राजकारण केलेंच पाहिजे, पण मुख्य भर आपलें क्षेत्र उत्तम रीतीनें तयार करून तें वाढविण्यावर पाहिजे. पण एवढी दगदग कोण घेतो ? बहुजनसमाज म्हणजे पुढाऱ्यांच्या शब्दास दुजोरा देणारी शक्ति. ती शक्ति वाढविली नाहीं तर मोठमोठ्यानें कौंसिलमध्यें घसाफोड केली तरी तीस कोण भीक घालील ! लोकप्रियता मिळविण्याच्या बाबतींत केलेली हयगय आमच्या पुढाऱ्यांच्या लक्षांत आली नाहीं, तरी कमिशनच्या खर्चाची मागणी परवां असेंब्लीमध्यें चर्चेस पुढें आली, त्या वेळीं होम मेंबर क्रेटर यांनीं ती गृहच्छिद्र म्हणून योग्य वेळीं पुढें आणली. ‘ सरकारी सभासद आणि विरुद्ध बाजू याशिवाय या बाबतींत मत देण्यास योग्य अशी एक एक तिसरी बाजू आहे व ती म्हणजे बहुजनसमाज होय, ’ असा त्यांनीं टोमणा मारला. लोकनियुक्त सभासद जरी निवडून आले असले तरी लोकांचा व त्यांचा संबंध काय प्रकारचा आहे हें सरकार एकसारखें अजमावीत असतेंच. लो. टिळकांना जर असा कोणीं सवाल टाकला असता तर अखिल भारतवर्ष त्या होममेंबरपुढें उभें केलें असतें. पण हल्लींच्या सभासदांनीं ती व्यंग्योक्ति मुकाट्यानें सहन केली. एवढेंच नाहीं, पण त्यांतील स्वारस्य काय हें लक्षांत न आल्यानें या तिसऱ्या पार्टीचा उल्लेख केला तर आम्ही कोण ? असें म्हणून आपलें बुद्धिमांद्य माल उघडकीस आणलें ! या वरील छोट्याशा गोष्टीवरून बहुजनसमाज नेहमीं समर्थ असणें पुढाऱ्यांच्या किती सोईचें आहे हें लक्षांत येईल. परंतु आमच्या पुढाऱ्यांच्या ही एक गोष्ट सोडून बाकी सर्व तोंडपाठ आहे ! बहुजनसमाज व पुढारी यांचें इतकें सूत, मग पुढाऱ्यांच्या मुत्सद्दीपणाची गोष्ट तर विचारांतच घेण्याची जरूरी नाहीं. एकादा दोरा काढून ते घोड्यागाडींतून मिरवितील, असंबद्ध बोलून

चार घटका लोकांना आपल्या अकलेचें प्रदर्शन करतील व शेवटीं ' वंदे मातरम् ' चा घोष करून हारतुरे पटकाविले, कीं झाला दौरा! राजकारणाच्या प्रत्येक शाखेमध्यें अशीच बंडाळी आहे. लोकांसही वाटतें, बरें झालें, एवढ्यावरच भागलें, नाहींतर महात्मा गांधीप्रमाणें शाळा सोडण्यास अगर तुरुंगांत जाण्यास यांनीं नाहीं भाग पाडलें! एखादा प्रश्न अगर चळवळ हातीं घेतली तर लोकांची कुवत ओळखून त्या मानानें तिचा प्रसार झटून करणें, आणि चाणाक्षपणानें पुढलामागला पेंच पाहून एकसारखी तिची प्रगति करणें, हे धोरणच नाहीं. लोकांमध्यें जोम कसा उत्पन्न करावा, त्यांचे दुर्गुण कसे घालवावेत, त्यांच्या अडीअडचणी कशा नाहींशा कराव्यात व राजकारणांत पाऊल घालण्यास त्यांस शक्ति, जोम व उत्साह ज्या प्रकारें वाढेल त्या तऱ्हेनें त्यांची स्थिति कशी सुधारावी याबद्दल तळमळ किती पुढाऱ्यांना आहे. कसायाच्या ताब्यांत सांपडलेल्या बोकडाप्रमाणें, बहुजनसमाजास बळी देणें हेंच कित्येक पुढारी आपलें कर्तव्य समजतात. जनतेच्या हितासाठीं एकसारखें झटत राहून त्यांच्या अंगांत शक्ति आणि ज्ञान यांचा संचार करविण्यानेंच पुढाऱ्यांचें अर्धेअधिक काम पुढें सोपें होतें. बहुजनसमाज स्वराज्यास लायक आहे किंवा काय हें सायमन कमिशन खेडोपाडीं हिंडून पहात आहे. असेंब्लीला मात्र ' तुम्ही कोण ? गोमा गणेश ! ' म्हणून होममेंबरच्या मार्फत त्यांनीं झिडकारलें! स्वराज्य मिळाल्याशिवाय समाजांत शक्ति पुरेपूर यावयाची नाहीं, हें आम्हांसही कबूल आहे. तरी पण ' तुला स्वराज्य पाहिजे काय ' म्हणून जरी एकाद्या अडाण्यास प्रश्न केला आणि सरकारी कारवाईखालीं जरी त्याला कमिशनपुढें आणलें असलें, तरी ' स्वराज्य पाहिजे; एवढेंच नव्हे तर स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी घेतल्याशिवाय केव्हांही राहणार नाहीं. ' असें ठासून उत्तर देण्याची धडाडी समाजाच्या त्या निकृष्ट अवयवामध्यें देखील आली पाहिजे! अशी परिस्थिति पुढाऱ्यांनीं निर्माण केली पाहिजे.

नाहींतर, तुरुंगांत जा म्हणून सांगितलें आणि बिचारा गेला ! पाठी-मागें भुकेनें तळतळणाऱ्या चार जीवांकडे पुढारी कशास ढुंकून पहातो आहे ! उलट त्याचें तत्व तयार आहेच कीं, स्वार्थत्याग करण्याची ज्यांची पात्रता आहे त्यांनीं ह्या सर्व गोष्टी सहन केल्याच पाहिजेत. स्वतः मात्र प्रकृति थोडी बिघडली कीं आजन्म तिसऱ्या क्लासनें प्रवास करणार म्हणून केलेला निश्चय बदलून लगेच पहिल्या क्लासवर येतात ! पण, थंडी असो, ऊन असो, प्रकृति चांगली असो अथवा मरणोन्मुख झालेले असोत ! ज्यांच्या नशिबाचा तिसरा वर्ग केव्हांही सुटण्यासारखा नाहीं त्यांनीं काय करावें, हा विचार देखील मनास शिवत नाहीं ! दूध सोडलें म्हणून सांगावें व त्या वेळीं फक्त गाय आणि म्हैसच माझ्या मनांत आली होती, शेळीची प्रतिमा त्या वेळीं दिसली नाहीं ! म्हणून गाईचें दूध सोडून शेळीचें दूध देखील वापरावें ! असला कमकुवतपणा ज्यांच्या अंगीं आहे, त्यांनीं ब्रह्म-ज्ञानाच्या शुष्क गोष्टी सांगून समाजास मात्र बळी द्यावें ! कां, तर स्वार्थत्याग म्हणून ! ब्रह्मज्ञानाच्या गप्पा वेड्यासारख्या झोंकून दिल्यानें ज्याप्रमाणें खरेंखुरें ब्रह्मज्ञान अनुभवायास मिळत नाहीं, त्याचप्रमाणें बहुजनसमाज स्वराज्यास पात्र नसेल तर स्वराज्यही मिळणार नाहीं. मग स्वतःच्या मर्जीखातर समा-जावर विनाकारण धोंड कां ?

यापेक्षां थोडें मागल्या काळचें उदाहरण लक्षांत घेतलें तरी देखील हीच गोष्ट निष्पन्न होते. शिवाजी महाराजांनीं सत्याग्रह कधीं केला नाहीं किंवा मोगलांच्या दरबारीं आपला वकील पाठवून स्वराज्याच्या मागणीचे खलितेही कधीं पाठविले नाहींत. स्वतःच्या कर्तबगारीनें एकएक मराठा मिळवितां मिळवितां ते मोगलास देखील भारी झाले. शिवाजी महाराजांची बंडाळी मोगलांनींच बादशहाच्या कानावर घातली. ज्या वेळीं आपली बाजू थोडी नमती घेतली पाहिजे असें वाटलें, त्या वेळीं त्यांनीं पड खाल्ली, परंतु अवि-चारानें स्वतःच्या प्रजेचा त्यांनीं कधीं नाश केला नाहीं अथवा तिच्या पर-

क्षणापासून ते कधीं च्युतही झाले नाहींत. स्वतःच्या वेड्या कल्पनांना बळी पडून त्यांनीं कधीं नुकसान करून घेतलें नाही किंवा मोगलांकडून भीक म्हणून कांहीं मिळेल या आशेनें मोगलांच्या असेब्लीमध्यें त्यांनीं पाऊल टाकलें नाहीं. उलट ज्यां वेळीं त्यांना तसा प्रसंग आला त्या वेळीं त्यांनीं असें अलौकिक तेज दाखविलें कीं, मोगल त्यानें दिपूनच गेला ! त्यांना यश आलें, कारण त्यांची दृष्टि ' मराठा तितुका मेळवावा ' ही होती. हल्लींच्या पुढाऱ्यांची अशी स्थिति फक्त इलेक्शनच्या वेळीं होते. त्या वेळीं एकेका इसमामागें सहासहा शिवाजी मनधरणी करीत असतात ! ही मनधरणी तरी या तोतया शिवाजींना मदत करण्याकरितां नव्हे, तर मोगलांच्या दरबारीं धाडून देण्याकरितां असते. एकदां त्यांचें आसन दरबारांत कायम झालें, म्हणजे उपमर्द झाला तरी, खराखुरा शिवाजी मोंगलांची तोंडावर निर्भत्सना करून त्यांच्या कैदेंतून पळून तरी आला, पण हे तोतये शिवाजी असल्या उपमर्दास कोडगेपणानें तोंड देऊन ' अजून कांहीं मिळेल ' या आशेवर लाळ घोटीत तेथेंच बसतात ! आपली जागा म्हणून कांहीं केल्या सोडीत नाहींत !

सद्यःस्थिति या स्वरूपाची आहे. यांतून कशी काय वाट निघेल तें पाहिलें पाहिजे.

---

# ( ४ ) भविष्यत्कालचा नकली सूर्यप्रकाश.

भविष्यत् कालाकडे नजर फेकल्यास मामला मोठा आणीबाणीचा दिसतो.

कमिशनचे दौरे जरी हिंदुस्थानांतून इकडून तिकडे चालले होते, तरी कमिशनबद्दल चोहोंकडे अविश्वास पसरलेला दिसला. ब्रिटिश पार्लमेंटमधील ज्या सत्तारूढ कॉन्झरवेटिव्ह पक्षानें कमिशन पाठविलें, त्याच्या हेतू-

म. ग्रं. सं. ठाणे

बद्दल यत्किंचित् शंका घ्यावयास नको. कदाचित् पुढें मजूर अगर लिबरल मजूर अशा तऱ्हेचें प्रधानमंडळ अस्तित्वांत येण्याची त्यांना भीति असल्यानें आपल्या ह्यातींत निदान कमिशनचें काम तरी शिजून तयार झालेलें चांगलें, या स्वार्थीपणाच्या हेतूनें त्यांनीं कमिशनची नेमणूक दोन वर्षें अगाऊ केली आहे. कदाचित् पुढें दुसऱ्या पक्षाचें प्रधानमंडळ झाल्यावर त्यांना हिंदुस्थानची दया आली तरी त्यांस विशेष कांहीं करतां येऊं नये हा मूळ हेतु आहे. आजकाल जगांतील व्यापारामध्यें सर्व राष्ट्रांमध्यें अहमहमिका सुरू असल्यानें, व्यापारास फायदेशीर असें हिंदुस्थानांतील अमर्याद क्षेत्र आपल्या हातचें घालवितां कामा नये, अशी इंग्लंडांतील जमिनदार व भांडवलवाले लोकांची इच्छा आहे. अमेरिका, जर्मनी, जपान वगैरे राष्ट्रांच्या औद्योगिक शाखांची झपाट्यानें वाढ होत असल्यानें त्यांच्याशीं टक्कर देणें ब्रिटिश धंदे-वाल्यांना जड जात आहे. इंग्रजांचें खुद्द जीवित त्यांनीं अंकित केलेल्या साम्राज्यावर बहुतांशीं अवलंबून असल्यानें हिंदुस्थानास बसलेली ही त्यांची मगरमिठी केव्हांही सैल होणें शक्य नाहीं. व ती सोडविण्याचा कोणीं प्रयत्न केल्यास स्वतःच्या शरिरांत यत्किंचित् त्राण आहे तोंपर्यंत विरोध केल्याशिवाय ते रहाणार नाहींत. हल्लीं चालू असलेल्या त्यांच्या हालचालीं-वरूनही हेंच व्यक्त होत आहे. अमेरिका व ब्रिटन यांमधील तेढ एकसारखी वाढत आहे. बोल्शेव्हिक रशियाचें आस्वल अफगाणिस्थानच्या सरहद्दीवर वावरत असल्यानें, त्या दोहोंचीही भीति इंग्रजांस एकसारखीच वाटूं लागली आहे. चीनचा पिवळा बागुलबोवा स्वातंत्र्याबद्दल एकसारखी तडफड करीत आहे. परंतु अमेरिका वगैरे राष्ट्रांच्या तटस्थपणामुळें इंग्लंडचें चीनमध्यें चाले-नासें झालें आहे. सुवेझचा कालवा आपल्या हातांत रहावा म्हणून इजिप्तवर एकेक अट जास्त लादण्याचा प्रयत्न सुरू आहे. इराणचा बागुलबोवा पुढें करून वहाबी इब्न सौदशीं तंटा करण्याची प्रवृत्ति वाढत चालली आहे. बेहे-रीन बेटांसाठीं इराणशीं धुसफुस चालू आहे. इंग्लंड स्वतःच्या जबाबदारीवर

एकाद्या युद्धांत पडलें तर आम्हांस तटस्थ राहाण्यास काय हरकत आहे, म्हणून जनरल हर्टझॉग विचारीत आहेत. हिंदुस्थानांतील मर्म–ठिकाणांची पहाणी इंग्लंडचे युद्धमंत्री विशेष गाजावाजा न करतां करीत आहेत.

प्रत्यक्ष हिंदुस्थानामध्यें तरी हें कामिशन काय पद्धतीनें वागलें तें आपणांस दिसून आलेंच आहे. कामिशनच्या बरोबरीनें लेजिस्लेटिव्ह कमिट्यांना वागवूं म्हणून कमिशनर्स जाहीरनामा काढतात, पण हिंदी कमिट्यांचा रिपोर्ट हिंदी पार्लमेंटमार्फत जाईल व त्याचा योग्य तो ( ! ) विचार होईलच, अशी कारस्थानीपणाची शक्कल त्यांनीं लढविली आहे. मिस मेयोनें अगाऊच हिंदुस्थानची निंदा करून चोहोंकडे गैरसमज पसरविलेला असतां कमिशननेंही खेडोपाडीं हिंडून तोच कित्ता गिरविण्याचें काम केलें. हिंदुस्थानसरकार आणि प्रांतिक सरकार यांचे ‘कमिशन लोकप्रिय आहे’ असें दाखविण्याचे खरेखोटे प्रयत्न एकसारखे चालू होतेच. कमिशनवर घातलेला बहिष्कार असाच आणखी सहा महिने पुढें चालू ठेवला तर लोकपक्षाशीं संबंध जोडण्यासाठीं कमिशन प्रयत्न केल्याशिवाय रहाणार नाहीं, असे आशेचे उद्गार कांहीं लोकांनीं काढिले आहेत. तें कांहींही असो. कमिशनवरचा बहिष्कार दूर होण्यासाठीं, कमीशननें राउंडटेबल कान्फरन्स भरवलें आणि लोकपक्षाची योजना एकदां कमिशनच्या हातांत आली, म्हणजे कमिशनला जें कांहीं करावयाचें आहे तें केल्याशिवाय तें केव्हांही राहणार नाहीं. हिंदुस्थानांत बिनतारी यंत्रांच्या योजना, वैमानिक दलाची भरती आणि सैन्यामध्यें जे फेरफार चालु आहेत त्यावरून हिंदुस्थानास चांगले दिवस दिसतील असें अनुमान करवत नाहीं. एवढेंच नाहीं तर जेथें स्कीन कमीटीच्या सूचनांचे मसुदे फेटाळून लावले जातात त्या ठिकाणीं हिंदी बहुजनसमाजानें बलवान् होऊन आपल्या पायावर उभें राहण्यास शिकावें ही इच्छा सुद्धां असलेली दिसत नाहीं.

अशल्या परिस्थितीमध्यें लोकांकडे पहावें तर, सुधारणाकायद्यानंतर जसा

त्यांचा काल व्यर्थ गेला, त्याचप्रमाणें या चालू कमिशनच्या योजनांचा अम्मल होऊं लागला म्हणजेहि तसाच व्यापार हुंडणावळीच्या बाबतींत होत असलेले अत्याचार, टरीफ बोर्ड वगैरे बाबतींत चालू असलेलें नुकसान बंद होण्याची आशा नाहीं. हिंदुस्थानच्या संपत्तीस हें जें खोरें एकदां लागलें आहे तें बंद झाल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही उपायांनीं त्याच्या उद्योगधंद्याची वाढ होऊन सांपत्तिक स्थिति सुधारण्याची आशा नाहीं. हिंदुस्थानांतील व्यापार व संपत्ति यांकरितां जर ही सारी धडपड तर तो हातचा जाईल अशा तऱ्हेच्या कोणत्याही योजना अमलांत येणें शक्य नाहीं. लोकांची दुर्बलता इतकी वाढली आहे कीं, परकीयांस देखील तिजबद्दल कींव आल्यावांचून रहात नाहीं. जातीजातींमधील तंटे, पक्षापक्षांमधील मतभेद, आणि बहुजनसमाजास अज्ञानानें व हीन परिस्थितीनें आलेला दुबळेपणा व शैथिल्य हीं जोंपर्यंत नाहींशी होणार नाहींत, तोंपर्यंत, या हीन परिस्थितीमधून बाहेर पाऊल पडणें शक्य नाहीं. आणि एवढ्याचकारितां, सध्या चालू असलेल्या यांत्रिक राजकारणाचा अवलंब जरी पुढाऱ्यांनीं केला, तरी त्यांचें कार्य म्हणजे समाजास स्वराज्यास लायक करणें, व त्याच्या पाठबळाच्या जोरावर तें मिळवणें हेंच होय, ही गोष्ट नाकबूल करतां यावयाची नाहीं. याच हेतूनें पूर्वीं दे. भ. दास यांनीं देखील ग्रामसुधारणेबद्दल एवढा अट्टाहास केला.

समाजाकडे दृष्टि गेली म्हणजे समाजाचें खरें स्वरूप डोळ्यांपुढें उभें राहतें. समाजाची स्थिति हल्लीं कशी झालेली आहे याबद्दल पूर्वीं एकदोनदां उल्लेख केलाच आहे; आणि जेथें प्रत्यक्ष स्थिति डोळ्यांपुढें दिसत आहे तेथें वर्णनानें जास्ती तें काय साधणार! आजकाल हिंदुस्थानांत हिंदुसमाजाची ख्याति त्याच्या शांततेबद्दल फार आहे! दुसऱ्या कोणीही हिंदुसमाजाची कांहीं आगळिक केली तरी हिंदूंनीं ती निमुटपणें सहन करावी, अशी हिंदूंची ख्याति आहे! मुसलमान लोक हिंदूंच्या सुमारें तिसरा हिस्सा आहेत, तरी देखील त्यांच्याकडून गेल्या कित्येक वर्षांत आगळिकी व अत्याचार हिंदू-

वर होत असतां देखील हिंदूंच्या हातून त्यांना आळा घालण्याचें काम होत नाहीं. उलट पाठीमागून मुसलमानांच्या नांवानें खडे फोडण्याचें काम मात्र पटाईतपणें करण्यास हिंदू नेहमीं एका पायावर तयार असतो. हे अत्याचार फार वाढूं लागले त्या वेळीं हिंदुमहासभेची स्थापना हिंदूंनीं केली. परंतु हिंदंमध्यें जोम आणण्याचें काम जसें नेटानें व पद्धतशीरपणानें व्हावयास पाहिजे तसें होत नाहीं. आगळिकचे हे प्रसंग आले म्हणजे त्यांत भाग घेण्याचें हिंदूंच्या जिवावर येतें. कारण हिंदू जात्या शांतताप्रिय असून आरोपी म्हणून कोर्टाची पायरी चढणें म्हणजे त्यांस एकप्रकारची जोखीम वाटते. डोळ्यापुढें चाललेल्या अत्याचारानें चीड येऊन हिंदू अशा वेळीं योग्य त्या बाजूस मदत करणार नाहीं. उलट तो असें म्हणेल कीं, मायबाप सरकाराकडे याची खास दाद लागेल ! या स्थाच्या असहाय स्थितीचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे हिंदी समाजामध्यें असलेला ऐक्याचा अभाव हें होय. हिंदुसमाजामध्यें जेवढ्या जाती पडलेल्या दिसून येतात तितके विभाग त्याचे झालेले आहेत. आणि हे विभाग तरी एकोप्यानें राहतात असा मुळींच नियम नाहीं. यत्किंचित् साध्या गोष्टींतही एकानें दुसऱ्याच्या हितास झटण्याची प्रवृत्ति नाहींशी झालेली असून, उलट दुसऱ्याचें नुकसान जेणेंकरून होईल तें करण्यासाठीं प्रत्येकजण खटपट करील. परोपकार, शेजारधर्म, निघडेपणा यांचा पूर्णपणें अभाव असून, स्वार्थीपणा आणि नीच मनोवृत्ति यांचा फैलाव चोहोंकडे एकसारखा होत आहे. धर्माचें यत्किंचित ज्ञान नसल्यानें धर्माच्या नांवाखालीं अनेक अत्याचार हिंदुसमाजावर होत आहेत, तरी या गर्तेमधून वर निघण्याची इच्छा न धरतां, तीमध्येंच अधिकाधिक डुंबण्यामध्यें हिंदूंना मजा वाटते. हिंदूसमाजाच्या ज्या अनेक जाती आहेत त्यांच्याकडून आपापले समाज सुसंघटित करण्याचे प्रयत्न चालू आहेत, तरी प्रत्येक समाजांत या संघटनाच्या एकाच प्रश्नावर दुफळ्या होऊन मूळच्या कार्याकडे दुर्लक्ष झालेलें दिसून येतें. प्रामाणिकपणा व सुविचार या दोन्ही सद्गुणांचा प्रत्येक

समाजाच्या कांहीं भागांत अभाव असलेला दिसून येतो आणि म्हणूनच नेहमीं सरळ चाललेल्या मार्गक्रमणामध्यें कांहींतरी घोटाळे उत्पन्न होऊन समाजसुधारणेचा प्रश्न कांहीं केल्या नेटास लागत नाहीं. देशद्रोह अथवा समाजद्रोह करण्यामध्यें समाजांतील घटकावयवांना कांहीं फिकीर वाटत नसल्यानें, अखिलभारतीय हिंदुसमाजामध्यें केवढाले तट पडले आहेत त्याची कल्पना होत नाहीं. समाजाच्या मार्गांत पसरलेले हे कृष्णसर्प दिवाभितांप्रमाणें लपून न रहातां, नेहमीं राजरोस मिरवत असतात व शत्रूकडून त्यांना नेहमीं शाबासकी व मोठेपणा मिळत जातो. कोणत्याही एका प्रश्नावर ज्या वेळीं एकमत होत नाहीं, त्या वेळीं खरें पाहिलें म्हणजे सर्व साधकबाधक गोष्टींचा विचार केल्यावर पहिल्याचें मत चूक असेल किंवा दुसऱ्याचें असेल. ज्याचें मत खरोखर चुकीचें असतें, तो जाणुनबुजून आडमार्गांत शिरत असला पाहिजे. तथापि या मतस्वातंत्र्याच्या सुधारलेल्या कालामध्यें विचारस्वातंत्र्याच्या नांवाखालीं धडधडीत खोटेपणाचें वर्तन करण्यास तर कांहीं वाटत नाहींच, परंतु त्याचा उघडउघड प्रतिकार करून खरें स्वरूप बाहेर आणण्याचा प्रयत्न केला जात नाहीं. राजनीतिपटु म्हणून सर्व जगांत उजळ माथ्यानें वावरणाऱ्या या शहाण्यासुर्त्या लोकांना स्वतःच्या देशाबद्दल ज्यावेळीं विचार प्रदर्शित करावयाचे असतात, त्या वेळीं मतस्वातंत्र्याच्या नांवाखालीं स्वदेशास काळिमा आणणारे विचार प्रदर्शित केले जातात व त्याबद्दल त्यांना कोणी राजरोसपणें दोष देत नाहीं, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. मोठा माणूस कितीही मोठा झाला तरी जेव्हां तो सामान्य नागरिकास देखील लाजिरवाणें अशा तऱ्हेचें वर्तन करूं लागतो, त्या वेळीं त्यास खाड्दिशीं त्याच्या उच्चासनावरून खालीं ओढण्याचें काम जनतेनें केलें पाहिजे. मतस्वातंत्र्य ही जरी एक उत्तम चीज असली तरी तिचा जेव्हां असा दुरुपयोग केला जातो त्या वेळीं तें मतस्वातंत्र्य नसून मतपारतंत्र्य होय हें जनतेनें ओळखलें पाहिजे. शहाण्यासुर्त्या लोकांकडून असे

निंद्यपणाचें आचरण ज्या ज्या वेळीं केलें जातें, त्या त्या वेळीं त्यांचें शहाणपण विलयास गेल्यामुळें, त्यांची वृत्ति नीचपणाची झालेली आहे असें समजून त्याचा तांबडतोब बंदोबस्त जनतेनें केला पाहिजे. जें शहाणपण अगर जो मोठेपणा देशास कमीपणा आणण्यास कारणीभूत होतो तें शहाणपण नसून ती दुर्बुद्धि होय व तो मोठेपणा नसून समाजाच्या निकृष्ट स्थितीचें तें एक उदाहरण आहे असें समजून, अशा मनुष्याच्या नुकसानकारक हालचाली जेवढ्या बंद केल्या जातील तेवढ्या चांगल्या! परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, असलें नामुष्कीचें वर्तन करणाऱ्या या लोकांस स्वतः-च्या कृतीबद्दल केव्हांही शरम वाटत नाहीं. असेंब्ली व कायदेकौंसिलें यांमधून घडत असलेले असले प्रसंग प्रत्यहीं नजरेस येतात. राष्ट्राच्या बाजूनें मत न देतां विरुद्ध बाजूस जाऊन मिळणें, निदान तटस्थ वृत्ति स्वीकारणें या गोष्टी आतां रोजच्या सरावांतल्या झाल्या आहेत. परंतु या पशुवत् आचरण करणाऱ्या लोकांना आपल्या हरामखोरीबद्दल यत्किंचित् तरी शरम वाटलेली दिसते काय ? या सर्व गोष्टींवरून या असल्या लोकांचा वर्ग देशामध्यें केवढा मोठा असेल याची कल्पना येईल. ही मनःस्थिति सुधारून, किंवा असल्या लोकांचे प्रयत्न बंद पाडल्याशिवाय देशामधील खऱ्या मताचा राज-कारणावर योग्य तो परिणाम होणें शक्य नाहीं. या देशद्रोहीपणाच्या मनः-स्थितीमुळेंच आजपर्यंत हिंदुस्थानचें एवढें मोठें नुकसान झालें आहे. आणि म्हणून या दिशेनें बहुजनसमाजाची मनःस्थिति शुद्ध करणें व असल्या नुकसानकारक प्रयत्नांचा नायनाट करणें ही कामें पुढाऱ्यांनीं हातीं घेतलीं पाहिजेत.

यानंतर विचारांत घेण्यासारखी दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे हिंदुस्थानां-तील उद्योगधंदे, कलाकौशल्य व संपत्ति यांचा ऱ्हास ही होय. अप्रामाणिक-पणाची वर दर्शविलेली हीनबुद्धि या बाबतींतही पूर्णपणें दृगोचर होते; व या ऱ्हासास तीच बहुतांशीं कारणीभूत झालेली दिसते. हिंदी भांडवल-

ग्रंथसंग्रहालय भ. चा नेकली सूर्यप्रकाश

वाल्यांनीं एखादा धंदा उभारला तर तो उभारतांना स्वतःची तुमडी कशी भरतां येईल त्याबद्दल रूपरेखा आगाऊ आखून मग तो त्या धंद्याची उभारणी करील व प्रथमपासून त्याच दिशेनें प्रयत्न चालू ठेवून स्वतःची तुंबडी भरली म्हणजे दिवाळें वाजवून लवकरच त्यांतून तो मोकळा होईल. यदाकदाचित त्यानें धंदा चालूं ठेवला तर त्याच्या भागीदारांशीं तरी तंटा करून त्यांना तो बुडवील. याप्रमाणें कितीतरी कंपन्यांचीं आणि पतपेढ्यांचीं दिवाळीं आजपर्यंत निघालीं आहेत. यदाकदाचित् या गोष्टी घडून आल्या नाहींत व धंदा सुरळीत चालूं लागला, तर त्या धंद्यास उत्कृष्ट स्वरूप येण्याचा प्रयत्न तो कधीं करणार नाहीं. त्या धंद्यामध्यें काम करणाऱ्या कारागिरांचें कलाकौशल्य कधीं वाढणार नाहीं व त्यामुळें त्यांचें वेतनही वाढण्याचा कधीं प्रसंग येणार नाहीं. धंद्यापासून उत्पन्न होणारा माल लोकांस पसंत पडतो किंवा नाहीं याची तो चौकशीही करणार नाहीं. कामकरी वर्ग सर्वस्वी त्याच्या मदतीवर अवलंबून असल्यामुळें त्यास चांगले दिवस कधीं दिसणार नाहींत. लोकांची जरूरी व आवडनिवड यांची कधीं तो चौकशी करीत नसल्यानें, त्याचा माल हळूहळू खपेनासा होतो. माल तयार करण्यास लागणाऱ्या खर्चांत काटकसर कशी करतां येईल याचा तो विचारही करीत नाहीं. त्यामुळें त्याच्या महागाईच्या मालास गिऱ्हाईक मिळण्याची पंचाईत पडते. परदेशी मालाच्या चढाओढीस त्याच्यानें टक्कर देववत नाहीं; व त्यामुळें त्याच्या धंद्यास ओहोटी लागून थोडक्याच काळांत त्याचा नाश होतो. तरी आपला धंदा सुधारण्याचा प्रयत्न करण्यांत व आपला माल खपविण्याकरितां लोकांमध्यें स्वदेशीचा पुरस्कार करण्यामध्यें त्यास एक प्रकारचा कमीपणा वाटतो. धंदा बुडत असतांना सरकारपुढें दीनवाणेपणानें प्रार्थना करण्यांत त्यांस कमीपणा वाटणार नाहीं, पण आमच्या मजूरवर्गाचें कलाकौशल्य व काम वाढवून, खर्चामध्यें बचत करण्याचा प्रयत्न तो करणार नाहीं. मग लोकांमध्यें स्वदेशीचा पुरस्कार कर-

ण्याची गोष्ट तर लांबच राहिली ! पूर्वी औद्योगिक चढाओढ एवढ्या तीव्रतेची नसल्यानें आपली मदत कांहीं वेळीं देऊन सरकार त्यास जिंदा करून ठेवीत असे. पण हल्लीं खुद्द ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या हिताची तजवीज अगोदर करण्याची जरूरी उत्पन्न झाल्यामुळें देशी कारखानदारांस दूर लोटण्यांत येतें. तथापि बहुजनसमाजाकडे घांव घेण्याची बुद्धि या जड बुडाच्या अहंमन्य लोकांस कांहीं केल्या होत नाहीं, त्यांतील बीज काय ! स्वकीयांस दूर लोटून परकीयांची कांस धरण्याची हीन मनोवृत्तिच याही ठिकाणीं पुनः एकदां दृगोचर होते !

याप्रमाणें कच्चया मालाचा उपयोग देशांतल्या देशांत होण्याचें उत्तरोत्तर कमी होऊन तो परदेशीं जातो, तरी पक्क्या मालाच्या स्वरूपानें तो पुनः एकदां देशांत येऊन देशांतील झाडून सर्व द्रव्य हरण करण्यास कारणीभूत होतो. याप्रमाणें संपत्ति लुटण्याचें काम सालोसाल चालू राहिल्यानें हिंदुस्थानांतील प्रजा अगदीं कंगाल बनली आहे. या ओहोटीस आळा बसल्यावांचून हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति सुधारणें शक्य नाहीं, व ती सुधारण्यास स्वदेशीचा पुरस्कार व परदेशी मालावर बहिष्कार अशा जोडगोळीचा इलाज केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. चहाकॉफीसारखीं शरिराचा ऱ्हास करणारीं पेयें व त्यांना लागणारा कप, बशा, साखर इत्यादि माल, कांचसामान, कापडचोपड, खेळणीं व चैनीचे दुसरे जिन्नस, औषधें व तेलें अशा एक ना दोन, हजारों परकीय वस्तु मोठ्या हौसेनें व अभिमानानें हिंदुस्थानांतील जनसमाज प्रत्यहीं वापरीत आहे. या परदेशी मालानें व्यापारी पेठा गच्च भरल्या असून हिंदुस्थानांतून क्रोडो रुपयांची लूट सालोसाल आज कित्येक वर्षें एकसारखी होत आहे. हिंदुस्थानांतील लोक एवढे कंगाल झालेले आहेत, तरी या घटोत्कचाच्या बाजारास आपल्या घरांत न घेत आपल्या पैशाची बचत करण्याचें कोणी मनावर घेत नाहीं. मिळेल तेवढा पैसा यांतच नाहींसा झाल्यानें गरिबापासून श्रीमंतापर्यंत सर्व लोकांची अवस्था

मोठी कठीण झाली आहे. संपत्तीच्या या ऱ्हासाबरोबरच शरीरशक्तीचा ऱ्हासही त्याच प्रमाणांत चालू असल्यानें हिंदुस्थानांतील माणूस इतर देशांच्या माणसापेक्षां किती तरी कमकुवत दिसतो. शरीरसंपत्ति व धनसंपत्ति या दोहोंनीं हिंदुस्थानांतील लोकांस सोडल्यामुळें, बाकी राहिलेल्या पुत्रसंपत्तीची गोष्ट तर विचारावयासच नको. मुलें होतात पण मरतात व जगलीं तरी खऱ्या नागरिकांचें कर्तृत्व बजावण्यास सर्वस्वी नालायख अशी प्रजा उत्तरोत्तर होत चालली आहे. हिंदुस्थानास जर सामर्थ्यवान् बनावयाचें असेल तर या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन त्या दिशेनें बहुजनसमाजाची स्थिति सुधारण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. हिंदुस्थानांतील मनुष्यास जिवंतपणा नाहीं, त्याचें कारण ही अवनतिच होय व तीमुळें तो सुधारण्याऐवजीं, देशद्रोह, अप्रामाणिकपणा आणि उत्साहाचा अभाव वगैरे दुर्गुणांची त्याच्यामध्यें एकसारखी भर पडत आहे.

याच बाबतींत आणखी एका तिसऱ्या गोष्टीचा विचार लक्षांत घेतला पाहिजे, व ती गोष्ट म्हणजे समाजांतील जातिभेद ही होय. चातुर्वर्ण्य-व्यवस्थेमधून कालांतरानें इतके भेद आणि पोटभेद उत्पन्न झाले आहेत कीं, त्यांचा शोध करण्यामध्यें एकाद्या संशोधकानें वर्षेंच्या वर्षें घालविलीं तरी तीं अपुरीं पडतील. हे पोटभेद कांहीं कांहीं ठिकाणीं इतक्या सूक्ष्म स्वरूपाचे असतात कीं, ते लक्षांत घेण्याची जरूरी देखील नसते. परंतु वंशपरंपरेचा अभिमान हा प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणास इतका खिळून बसलेला असतो कीं, प्रत्येक विवक्षित जातीस आपली विशिष्टता राखण्याचा मोह कांहीं केल्या आवरत नाहीं. आणि याच कारणामुळें हिंदुस्थानांतील जनसमाजाचे राई-एवढाले बारीक बारीक तुकडे चोहोंकडे पसरलेले दिसून येतात. इंग्रजी राज्यांतील अनेक विशिष्ट गोष्टींमुळें जरी सार्वजनिक व्यवहारांत या जातिभेदास वाव रहात नाहीं, तरी खाजगी व्यवहाराची गोष्ट पुढें येते त्या वेळीं या जातिभेदास योग्य तें महत्व दिलें जातेंच. आगगाड्यांतून, कारखान्यांतून, हॉटेलांतून या जातिभेदास कोणी भीक घालीत नाहीं. पाणी पुरविणाऱ्या

सार्वजनिक नळावर सर्व लोक एकसारखेच वापरतात व वागतात, परंतु तीर्थे-क्षेत्रें, धार्मिक व्यवहाराचे प्रसंग यांचा संबंध जेव्हां येतो त्या वेळीं पूर्वीची सहकारिता बाजूस राहून जातीजातींमधील विरोधाचें खरें स्वरूप लागलीच व्यक्त होतें. एका जातीपेक्षां दुसरी जात स्वतःस अधिक श्रेष्ठ समजते, पण दुसरी जात तें श्रेष्ठत्व कबूल करण्यास केव्हांही तयार नसते. यामुळें जातीमधल्या पोटभेदांमध्यें आपापसांत लढे उत्पन्न होतात, एवढेंच नव्हे तर निरनिराळ्या जातींमध्यें देखील तंटे झाल्याशिवाय रहात नाहीं. त्यामुळें समाजांत एकीऐवजीं बेबनाव मात्र एकसारखा चालू होतो. समाजाची यामुळें प्रगति होण्याचें दूरच राहिलें, पण आपापसांतील द्वेषाग्नि मात्र उत्तरोत्तर वाढत जातो. समाजाच्या हलाखीच्या स्थितीमुळें ही द्वेषाची लाट मात्र समाजामध्यें खळबळ सुरू असेल त्या वेळीं चालू असते, इतर वेळीं जीवनार्थ—कलहाचा जंजाळ एकसारखा मागें लागल्यामुळें समाजास वर डोकें काढण्यास वाव तरी कुठें मिळतो ! ही स्थिति पालटण्याकरितां निकृष्ट जातींना बाचित असलेल्या अनेक जुलमी निर्बंधांचे पाश तोडून, त्यांची उत्क्रांति करण्याचें काम आपण होऊन कळकळीनें श्रेष्ठ जातींनीं केलें पाहिजे. या हीनयाति लोकांना आपलें हितानहित कळूं लागल्यावर पूर्वीचीं तीं जुलमी बंधनें तशींच कायम राखण्याचा उलट प्रयत्न केल्यानें त्यांच्या मनांत श्रेष्ठ जातींबद्दल असलेला आदरभाव साहजिकच नष्ट होऊन त्या श्रेष्ठ जातींचा द्वेष करूं लागतात. त्यापेक्षां त्यांची स्थिति सुधारून त्यांच्यामध्यें उत्पन्न होणाऱ्या समाजशक्तीचा उपयोग राष्ट्राच्या उत्कर्षाकडे करण्यानें, एक तर ते सुखी राहतील, राष्ट्राचा फायदा होईल, व श्रेष्ठ जातींबद्दलचा त्यांचा आदरही उत्तरोत्तर वाढत जाईल. परंतु या गोष्टीकडे कोणी लक्ष्य न देतां उंबरांतील किड्याप्रमाणें जो तो आपल्यापुरतेंच पहातो. वर्णाश्रमधर्माप्रमाणें प्रत्येक जातीमध्यें जरूर असलेल्या विशिष्ट गुणांचा अभाव होत चालला आहे. ब्राह्मण या शब्दाच्या जुन्या व्याख्येप्रमाणें ब्रह्म जाणण्याचें बाजूसच राहो, पण नुसती पोपटपंचं

देखील ब्राम्हणांस करतां येत नाही. उलट त्यांत कमीपणा वाटून सर्व ब्राम्हण होतां होई तों सेवाधर्माकडे वळतात. शस्त्रें नाहींशीं झाल्यापासून शस्त्रास्त्रांमधील कलाकौशल्य क्षत्रिय म्हणविणाऱ्यांना सोडून गेलें व त्यांना कृषिकर्म सर्वस्वीं हातीं घ्यावें लागलें. परंतु कृषिकर्माची स्थिति तरी या अलिकडच्या काळांत इतकी दीन झाली कीं, या एकाच व्यवसायावर सर्व कुटुंबाचा संसार चालवितां येण्याची गोष्ट दिवसेंदिवस अशक्य कोटींतली झाल्यामुळें कृषिकर्मास दास्यत्वाची जोड दिल्यावांचून कुटुंबपोषणाचें काम समाधानकारक रीतीनें चालेनासें झालें. इतकें केलें तरी बिचाऱ्या शेतकऱ्यांच्या नशिबाचा कर्जबाजारीपणा नाहींसा न होतां, सावकाराच्या मारवाडीपणास बळी पडून कित्येक कुटुंबास देशांतर करून आपल्या मायभूमीस मुकावें लागलें आहे. वाणिज्याची गोष्ट तर विचारावयास नको. उद्योगधंदे चांगल्या रीतीनें चालत नसल्यानें, कारखान्यांतून व गिरण्यांमधून नेहमीं राबत असलेल्या लाखों लोकांच्या स्थितीकडे पाहिल्यावर पाषाणाचें देखील हृदय द्रवल्यावांचून राहणार नाहीं. राहतां राहिला अस्पृश्यवर्ग. वरील तिन्ही वर्गांच्या अशा वाईट स्थितीमुळें, त्यांच्या दास्यावर अवलंबून राहणारा हा शेवटचा वर्ग देखील, त्यांच्यापेक्षां अधिक केविलवाण्या स्थितीस पोंचला असल्यास त्यांत नवल नाहीं. याही वर्गानें मजुरीवरच आपला उदरनिर्वाह चालू ठेवून इतर सर्व वर्गांची दिशा पतकरली आहे. असें करण्याशिवाय त्यांना व इतरांना दुसरा एकही मार्ग दिसणें शक्य नाहीं, आणि दिसला तरी त्यांत उत्तेजन मिळून तो यशस्वी होण्याची संधी या परकी अमलाखालीं मिळणें दुरापास्त आहे. याप्रमाणें सर्वांकडून बाह्यतः जरी जातिविशिष्टत्वाचा पोकळ अभिमान एकसारख्याच प्रमाणांत दाखविला जातो तरी आपापलें जाति-विशिष्टत्व प्रत्यक्ष आचरणांत दाखवितां येत नसल्यानें, सर्व समाजानें बहुतेक एकाच मार्गाचा म्हणजे शूद्रत्वाचाच अवलंब उदरभरणार्थ केलेला दिसून येतो. हिंदुस्थानामध्यें अनेक शतकेंपर्यंत एकसारखा चालू राहिलेला परकीयांचा

अम्मल जरी या दीनपणास कारणीभूत झालेला असला तरी, मूळ स्वातंत्र्याचें पारतंत्र्यामध्यें रूपांतर होण्याच्या वेळीं व त्यापूर्वी देखील कित्येक कालपर्यंत, धर्माची वाताहत होऊन समाजांत जी एक तऱ्हेची फुटून निघण्याची प्रवृत्ति एकसारखी चालत आलेली दिसून येते, ती प्रवृत्ति, व धर्मभोळेपणा हींहि बहुतांशीं कारणीभूत झालेलीं दिसतात. सत्याचा यत्किंचित लेशही न राहतां असत्याची कास सर्वांनीं अद्यापपर्यंत धरलेली दृष्टीस पडते. ब्राह्मणापासून शूद्रापर्यंत स्वज्ञातिकर्तव्याबद्दल आस्था तर राहोच, पण दास्यत्वापासून राजकारणापर्यंत सत्यानें वर्तन करणारे लोक फारच थोडे दिसून येतात. आणि यामुळे कोणाचा विश्वास धरावा व कोणाचा नाहीं त्याबद्दल प्रत्येक वेळीं शंका येते. दुसऱ्याचें कोणतेंही काम करून द्यावयाचें असलें तर त्यास चापून वेतन घेऊनही तें वेळेवर करून देण्याची मुष्कील! ज्या वेळीं तें करून दिलें जाईल, त्या वेळीं त्यांत शंभर हिश्शे लबाडी आणि कलाकौशल्याचा अभाव तर ठरलेलाच असावयाचा. याप्रमाणें यच्चयावत् मनुष्यप्राण्याची चोहोंकडे एकसारखीच हीन प्रवृत्ति बनल्यानें एकानें लुबाडलेला पैसा त्याजकडून दुसरा तरी लुबाडतोच. या न्यायानें असत्याचरणानें समाजांतील सर्व घटकावयांमध्यें एकसारखी खळबळ चालू राहून देखील सर्व लोकांची स्थिति एकसारखीच भुक्या कंगालासारखीच झाली आहे यांत आश्चर्य नाहीं. सत्याची कास पुनः एकदां धरल्याशिवाय या प्राणहीन समाजाच्या अंगांत शक्तीचा विकास होण्याची गोष्टच नको.

---

# (५) महाराष्ट्र आणि हिंदुधर्म !

आणि येथें आम्हांस महाराष्ट्रातर्फे व महाराष्ट्रास उद्देशून चार शब्द लिहावेसे वाटतात.

' ज्या ज्या वेळीं धर्माला ग्लानि प्राप्त होते व अधर्माचार वाढतो त्या

त्या वेळीं मी स्वतः अवतार धारण करीत असतों " याप्रमाणें भगवान् श्रीकृष्णांनीं सांगितलेली वाणी सुप्रसिद्ध आहे. भक्तांच्या कल्याणाकरितां सदैव जागृत असलेल्या परमात्म्यानें जरी आपल्या भक्तांच्या रक्षणाकरितां याप्रमाणें अगाऊच ग्वाही देऊन टाकली आहे, तरी त्याप्रमाणें परमेश्वरानें हांकेसरसी धावून येण्यासाठीं टाहो फोडून हांक मारणारा भक्त अस्तित्वांत असला पाहिजे. मद्य पिऊन माजलेल्या दैत्यदानवदलांच्या रणामध्यें परमेश्वर अवतार घेण्यास केव्हांही तयार होणार नाहीं. कारण तेथें परमेश्वराची आठवणच आधीं होणार कोणास ? त्याचप्रमाणें जेथें धर्मास आलेल्या ग्लानीबद्दल यत्किंचित् देखील कोणास दुःख वाटत नाहीं अथवा त्याबद्दल फिकीर कोणी बाळगीत नाहीं, तेथें रक्षण करावयास परमेश्वराचें असें कोण असणार, म्हणून तो धावत त्यासाठीं येईल ? अथवा ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रिय यांच्या जोडीस परमेश्वरानें अलौकिक अशी बुद्धि आणि या कर्मचक्राचा भेद करतां येईल अशा तऱ्हेचें दिव्य आत्मस्वातंत्र्य दिलें असून अंशभूत परमात्मा जेथें प्रत्यक्ष वावरत आहे अशा बहुमोल कायेचा ज्यांस लाभ झाला आहे, त्यांना एवढी प्रबळ शक्ति प्रत्यक्ष स्वतःजवळ असतां, विन्मुख होऊन तिला ओळखण्याचा अगर ती हस्तगत करण्याचा प्रयत्न न करतां दीनवाणें पशुवत् संसाराचरण करून परमेश्वरशक्तीस स्वतःच्या काल्पनिक हीनस्थितीच्या उद्धारार्थ आव्हान करण्याचा यत्किंचितही हक्क उरत नाहीं, असें म्हटल्यास त्यांत वावगें काय आहे ? स्वतःच्या जाणूनबुजून केलेल्या चुकांकरितां असल्या दिव्य परमेश्वरशक्तीस एवढा त्रास द्यावयास लावण्याची कल्पनाच आधीं हीनमनस्कतेची आहे. हा एक दुबळ्या मनानें वेडेपणानें घेतलेला खोटा आश्रय आहे. परमेश्वरशक्ति इतकी अज्ञ नाहीं कीं, असल्या प्रत्येक वेड्या कुभक्तापुढें ती वावरत राहील !

ही कल्पना मनांत धरून कित्येक भोळेभाबडे लोक या अवतारकार्यावर या सुधारलेल्या काळांत देखील विसंबून राहिलेले दिसतात ! परंतु या गोष्टी

सामान्य जनांच्या कक्षेबाहेरच्या होत. सामान्य जनांस त्यांवर विसंबून स्वस्थ बसुन चालावयाचें नाहीं. त्यांना स्वतःचा प्रयत्न हाच त्यांचा मुख्य आधार होय व त्या आधारावर त्यांचें कार्य त्यांनीं चालू ठेवल्यास त्यांतच त्यांस परमेश्वरशक्तीचा लाभ होईल, नाहीं कोणीं म्हणावें? प्रत्यक्ष जनता वावरते आहे. यांतच जनार्दनाचें स्वरूप आढळून, या जनार्दनास जागृत करण्याचा प्रयत्न एकसारखा चालू ठेविला पाहिजे. स्वातंत्र्याशिवाय जनता सुदृढ होत नाहीं. जनता सुदृढ झाल्याशिवाय तिचें जिणें म्हणजे गोमयकीटकाप्रमाणें तुच्छ होत आहे. आत्मशक्तीचा विकास केल्याशिवाय कौंसिलांतल्या मागण्यांनीं अगर रडण्यांनीं स्वातंत्र्य मिळण्याची आशा नको. स्वातंत्र्यास योग्य अशी परिस्थिति बहुजनसमाजामध्यें स्वतंत्र रीतीनें निर्माण केली पाहिजे. राजकीय वातावरणाचें क्षेत्र राष्ट्रिय सभा, कौंसिलें यांनीं मर्यादित केल्यानें दूरवर दृष्टि पोंचत नाहीं. तेवढ्याच मर्यादित कोंडीमध्यें राष्ट्रपुरुष इकडून तिकडे एखाद्या पिंजऱ्यांत कोंडलेल्या मृगराजाप्रमाणें घिरट्या घालीत असतो बहुजनसमाजकेसरीस मोकळ्या वातावरणाचा लाभ करून देऊन त्याच्या देहस्वभावास चेतना आणविली पाहिजे. त्याशिवाय त्यानें आंतल्या आंत कितीही धडपड केली तरी तिची किंमत नाहीं. असल्या धडपडीस कोणी भीकही घालीत नाहीं. जनतेला राजकीय वातावरणाच्या जरी एका मोठ्या पिंजऱ्यांत कोंडून ठेविलें आहे, तरी राजकीय गोष्टी सोडून इतर बाबतींत असलेल्या स्वातंत्र्याचा उपयोग जनतेनें पूर्णपणानें करावयास शिकलें पाहिजे.

मागील प्रकरणांत सांगितलेले स्वदेशीचा पुरस्कार व परदेशीचा बहिष्कार, जातिभेदाचा बीमोड, कलाकौशल्याची वाढ व स्वदेशाभिमान, हे म्हणजे यांचेच पर्याय 'अन्नं ब्रह्म' हें तत्व, कर्मयोगानुष्ठान, आणि सदाचरण या मर्यादांनीं जनता वागेल अशा तऱ्हेचे प्रयत्न केले पाहिजेत. या वर दिलेल्या गोष्टी बिलकूल निरनिराळ्या नसून एकसमयावच्छेदेंकरूनच त्यांच्या खऱ्या

स्वरूपाविषयीं कल्पना येते व प्रत्यक्ष व्यवहारामध्यें देखील या सर्व गोष्टी एकसारख्याच अमलांत आणल्याशिवाय त्यांची सांगोपांग पूर्तता होत नाहीं.

आपण कोण आहोंत ? आपला देश कोणता ? त्याची स्थिति काय होती व काय झाली आहे ? हें असें कां व्हावें ? आतां यापुढें ध्येय कोणतें ? त्यास काय उपाय केले पाहिजेत ? याचा विचार करून जेथें जेथें ज्या ज्या मात्रेचा वळसा लागू पडेल तेथें तेथें ती ती मात्रा लागू करून जनतेचा उद्धार केला पाहिजे.

आपण हिंदु आहोंत, आपला देश हिंदुस्थान हा आहे. सनातन आर्यधर्म ज्या क्षेत्रांत फोफावला अशी ही पुण्यभूमि आहे. सनातन आर्यधर्म, हा, खरोखर संधी मिळाली तर जगाचा धर्म होऊन राहील. पण हा त्याचा मोठेपणा त्याच्या अनुयायांच्या कर्तृत्वावर अवलंबून आहे. सनातन आर्यधर्म हा कोणावर चढाई करण्याच्या क्षुद्र हेतूनें अवतीर्ण झालेला नाहीं. आपपर ही भावना त्याच्या ठायीं बिलकूल वास करीत नाहीं. उलट चराचर सृष्टीचें खरें स्वरूप उकलून प्राणिमात्रांच्या ठिकाणीं असलेल्या मिथ्या भ्रमाचें निरसन करून, त्यांस ' मी कोण ' याचें ज्ञान करून देणें हें त्याचें ध्येय आहे. प्रत्यक्ष परब्रह्मवस्तूशीं मायावृत परब्रह्माच्या कनिष्ठ स्वरूपाची भेट करवून देण्याचें सामर्थ्य यामध्यें आहे. प्रशांत समुद्राप्रमाणे त्याची स्थिति आनंदमय व शांत अशी आहे. त्यास जाणून घेऊन त्याप्रमाणें वर्तन करणाऱ्याच्या जन्ममरणाच्या फेऱ्या चुकविणारा असा तो कल्पवृक्षच आहे. प्राणिमात्रांच्या जीविताचें सार्थक्य साधणारा असा हा अलौकिक राजमार्ग असल्यानें याची योग्यता मोठी अपूर्व आहे. व्यक्ताव्यक्तांचा इतक्या खालीनें संबंध जुळविणारा असा हा आर्यधर्म एकटाच असल्यानें, व त्यानें दाखवून दिलेले मार्ग खात्रीशीर असल्यानें, ज्या वेळीं पुढें कदाचित् परब्रह्मशक्तीचा शोध लावण्याकडे भावी शोधकांची प्रवृत्ति होईल त्या वेळीं या धर्माच्या अमोघ शक्तीची जाणीव त्यांना झाल्याशिवाय राहणार नाहीं. व्यक्ताव्य-

क्ताचा सिद्धांत हा कायम स्वरूपाचा असल्यानें या नवीन शोधकांस देखील त्याचा आश्रय केल्याशिवाय गत्यंतर राहणार नाहीं. आणि या दृष्टीनें विचार केल्यास आर्यधर्माचा आश्रय केल्याशिवाय जगतास दुसरा उपाय सुचणें शक्य नाहीं. आर्यधर्माची महती आहे ती येथेंच आहे. हा प्रस्थापित झालेला मार्ग या आर्यावर्तामध्यें पूर्णत्वास आला व येथेंच तो फोंफावला. परंतु कालांतरानें त्यास प्राप्त झालेली हीन स्थिति शास्त्यांनीं सुधारली म्हणजे, पुनः एकदां तो आपल्या खऱ्या तेजानें चमकूं लागून, जगदुद्धाराकरितां संचारार्थ तो बाहेर पडेल.

जगामध्यें आजकाल जेवढे धर्म प्रस्थापित झालेले आहेत, त्या सर्वांनीं स्वतःच्या संस्कृतीच्या वाढीकरितां म्हणून निरनिराळे देश व्यापलेले आहेत. आर्यधर्माचें गृह हिंदुस्थान देश हें आहे. ख्रिस्तीधर्म, इस्लाम, बौद्ध या सर्वांच्या मालकांचे निरनिराळे देश त्या त्या धर्माच्या संस्कृतीच्या वाढीकरितां आज मोकळे आहेत. परंतु दैवगतीनें हिंदुस्थानामध्यें दुसऱ्या धर्मांचा शिरकाव झाल्यानें, हिंदुधर्मास केवळ शैथिल्यच आलें एवढेंच नाहीं, तर इतर धर्मांची प्रवृत्ति हिंदुधर्मावर चढाई करण्याची नेहमीं दिसून येते. परंतु हिंदूस्थानच्या राजकीय आकांक्षेबरोबर, धार्मिक उन्नतीची वाढही आतां झाल्याशिवाय रहाणार नाहीं. तूर्त जरी या धार्मिक उन्नतीस अद्याप आरंभ झालेला देखील दिसत नाहीं, तरी सनातन आर्यधर्माचा संदेश इतर सर्व धर्मांच्या लोकांस थोडक्याच काळामध्यें पोंचल्याशिवाय राहणार नाहीं. या संदेशाचें स्वरूप अशा प्रकारचें आहे कीं, आर्यधर्माचें वसतिस्थान हिंदुस्थान हें असून, आर्यधर्मास या देशामध्यें पूर्ण वाव मिळाला पाहिजे. आर्यधर्माची सर्वांस अशी ताकीद आहे कीं, हिंदुस्थानामध्यें कितीही निरनिराळे धर्म प्रचलित असले तरी हिंदुस्थानच्या संस्कृतीवर हिंदुधर्माचा पूर्ण हक्क आहे आणि म्हणून इतर कोणत्याही धर्मास आपलें विशिष्टत्व हिंदुस्थानांत कायम राखण्याचें असेल तर हिंदुधर्मसंस्कृतीशीं त्याचा विरोध होणार नाहीं अशा

3463

रीतीनें त्या त्या धर्मांनीं आपापल्या संस्कृतीमध्ये फेरबदल केला पाहिजे. हिंदु धर्माच्या ठराविक संस्कृतीस कोणीही अडथळा करतां कामा नये. त्यानें घालून दिलेल्या संस्कृतीस विरोध येणार नाहीं याप्रकारें इतर धर्माच्या लोकांनीं आपलें आचरण ठेवलें पाहिजे. आर्य संस्कृति मूळांत कोणास बाधक होईल अशी नाहीं. हिंदुस्थानास स्वराज्य मिळाल्यास सर्व धर्मांस सारखीच मोकळीक मिळेल यांत संशय नाहीं. परंतु धर्माविषयींचा दुराग्रह कोणी जाणून बुजून धरून हिंदुस्थानच्या सुखाचा नाश करण्याचें मनांत आणील तर त्यानें हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, हिंदू हा पूर्वीचा दुबळा हिंदू आतां राहिलेला नाहीं. आर्यधर्माचा हिंदुस्थानावर हक्क आहे आणि तो हिरावून घेण्याच्या प्रयत्नांत कोणास यश येणें शक्य नाहीं, आणि म्हणून आर्यधर्म घालून देईल ते धडे आपापल्या धर्मांशीं मिळते करून घेऊन इतर धर्मीयांनीं हिंदुधर्माशीं सहकार्य करणेंच शहाणपणाचें होईल. सहकार्य केल्यास आर्यधर्मांतील उच्च तत्त्वांच्या आचरणानें निदान शेजारधर्मानें या परधर्मीयांचें शाश्वत कल्याण होण्याचा संभव आहे. उलट, विरुद्ध बाजू स्वीकारल्यास तिचे दुष्परिणामही त्याचप्रमाणें त्यांना भोगावे लागतील.

मागील प्रकरणांत सुचविलेले समाज, धर्म व राजकीय परिस्थिति यांच्या सुधारणांचे उपाय जरूर अमलांत आणून हिंदीसमाजास सुदृढ बनविणें किती जरूरीचें आहे, तें समजून येईल. स्वदेशीचा पुरस्कार, परदेशीचा बहिष्कार, जातिभेदनिरसन, लोकांच्या कर्तृत्वशक्तीची वाढ आणि स्वधर्माचें ज्ञान वगैरे उपाय योजून जनसमाजाची स्थिति सुधारण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. समाजांतील राष्ट्रीयत्वाचा नाश झालेला असतो त्या वेळीं समाजामध्यें धर्म, ज्ञान आणि कर्तृत्व यांची वाढ राहिलेली नसते. परकी राष्ट्राच्या जुलमी सत्तेखालीं समाज चिरडून गेल्यामुळें त्यामध्यें बुद्धि, शक्ति, ऐक्य आणि स्वातंत्र्यप्रवृत्ति यांचा अभाव झालेला असतो. प्रत्येक जिवंत असलेल्या मनुष्याच्या अंगीं प्रचंड शक्ति सांठवून ठेवलेली असतां, अशा प्रत्येक इसमास

संग्रह

'आपण दुबळे अगदीं आहोंत' असा भास होऊं लागतो. एकास दुसऱ्याचा आधार मिळण्याऐवजीं, प्रत्येकजण दुसऱ्यास शत्रूप्रमाणें भासूं लागतो, व परकी उचल्यांची आयतीच पोळी पिकते. इंग्रजी अमदानींत सुधारलेल्या शिक्षणानें पूर्वींच्या या ओबडधोबड दुबळ्या परिस्थितीस हल्लीं जरा नाजूक आणि सुधारलेलें स्वरूप आलें आहे एवढेंच. तरवारीनें शेंडी छाटून धर्मांतर करावयास लावण्याऐवजीं मिशनरी लोक साखरेप्रमाणें गोड बोलून तेंच काम चालवीत आहेत. तरवारीच्या धाकानें प्रजेस दरारा बसविण्याऐवजीं, दुबळ्या खुळचट शिक्षणानें आमच्या तरुण पिढीचीं कोंकरें बनविलीं जात आहेत. देशांतील शौर्यास आश्रय न मिळाल्यानें जरी त्यास पूर्वीं दारोदार हिंडावें लागत असलें, तरी हल्लींचे आश्रित बनलेले आमचे शूर वीर सैनिक लोक स्वकीयांच्या व दुसऱ्या स्वतंत्र चिमकुल्या राष्ट्रांच्या मुंड्या मुरगळण्याचें निंद्य कर्म करीत आहेत. पूर्वीं मोंगल दरबारांत मनुष्याची किंमत ओळखून त्याच्या शहाणपणाचा लाभ मिळावा म्हणून मोठमोठ्या लोकांस मान देण्यांत येत असे. हल्लींच्या दरबारांमध्यें माणूस प्रथम अजागळाप्रमाणें निरुपद्रवी आहे अगर कसें तें चेंपून पाहून, तो परीक्षेस उतरला तर त्यावर उपकार म्हणून हमाली बहाल करण्यांत येते. व्यापार, शेती, उद्योगधंदे जुन्या पद्धतीनें करण्याची पद्धत गैरफायद्याची समजली जाऊन स्टॉकएक्श्चेंज, शेअरबाजार, पुढील मुदतीचे वायदे, कंपन्या वगैरे अनेक जुगाराच्या स्वरूपाच्या योजनांनीं हिंदुस्थानच्या संपत्तीची राखरांगोळी चालविली आहे. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य गेलें, शहाणपण गेलें, शौर्य गेलें, संपत्ति गेली; हिंदुस्थानचा दर्जाही गेला! हिंदू म्हणजे धर्महीन काफीर, मूढ, नामर्द, भिकारी, दुबळा! त्याची इज्जत वाटेल त्यानें घ्यावी व शेजारच्या हिंदूंनीं तटस्थपणानें तिकडे पहात रहावें! हरहर! सनातन आर्यधर्माचें समाजसुधारणेचें अलौकिक ध्येय कोणीकडे आणि तिच्या रूपांतराचें भकास दिसणारें हें दृश्य कोणीकडे! स्वातंत्र्य नाहींसें झालें, पण त्याबरोबर जगांतील माणूसपणास देखील आम्ही मुकलों. जगां-

तील स्वतंत्र राष्ट्रांमधील एखाद्या मनुष्यानें स्वतःबद्दल केव्हां विचार मनांत आणल्यास तो असें म्हणेल कीं, प्रथम 'मी' आणि 'माझ्याकरितां इतर सर्व तजविजी.' आमच्या मनांत हाच विचार घोळूं लागला तर 'मी'पणाचा विचार तर शिल्लक रहातच नाहीं. प्रथम शृंखलाबद्ध पारतंत्र्य व त्या मर्यादेच्या आंत मानवी जीविताचा निःसार संसार असें अभिमानशून्यतेचें दृश्य डोळ्यांस दिसूं लागतें. पारमार्थिक दृष्टया अशी स्थिति राष्ट्रास आपल्या नजरेपुढें राहूं देण्याइतकी पात्रता त्या राष्ट्रामध्यें असूं शकेल तर ती इष्टच आहे. पण या 'मी' पणाच्या अभावाचें व निःसारतेचें कारण संतोष अगर शम हें नसून समाजाच्या अमर्याद निराशेमध्येंच सांपडतें. समाजघटकाच्या सुखसंसारासाठीं समाजव्यवस्था अमलांमध्यें येते. समाजास ऐहिक–पारलौकिक हिताचा लाभ करून देण्यासाठींच समाजांतील धार्मिक व राजकीय व्यवस्थ अस्तित्वांत येतात. समाज स्वतःसिद्ध स्वतंत्र असून त्याच्या कल्याणासाठीं या दोन्ही योजना असतात. स्वातंत्र्याशिवाय दुसरी कोणतीही अवनतीची कल्पना ज्याच्या मनास आजपर्यंत कधीं शिवलेली नाहीं अशा अमेरिकन मनुष्यास राजा म्हणजे काय व पारतंत्र्य कशास म्हणतात हें पुसा! जगामध्यें असलेल्या मनुष्यप्राण्याचा संसार सुखानें चालला पाहिजे हेंच मूळ ध्येय असल्यावर त्या ध्येयास फाटा देणाऱ्या सर्व गोष्टी तो अमेरिकन निदान स्वतःपुरत्या तरी नाकबूल करील. कारण त्यांना बाळकडूच तसें मिळालेलें असतें. परंतु जन्मास आल्याबरोबर जेथें बागुलबोवा भिववूं लागतो, व भुतेंखेतें पछाडूं लागतात, तेथें उत्तरोत्तर मिळणाऱ्या राजनिष्ठेच्या व साम्राज्यवादाच्या घळ्यांनीं बिचाऱ्या हिंदूस स्वातंत्र्याची कल्पना कोठून येणार? स्वतःवर अत्याचार घडत असतां, तावडतोब कायदा व पोलीस यांचीं दुःश्चिन्हें जेथें दिसतात तेथें स्वतःच्या जीविताचा विचार करूं लागलें तर ज्यामध्यें स्वतःची मालकी कांहीं नाहीं अशा परकीय साम्राज्याच्या वेढ्यामुळें कसें तरी जाणारें कीटकमय क्षुद्र जीवन दिसूं लागतें. हिंदूंवर होणारे अनेक अत्याचार शिवाजी महारा-

ज्यांस अगदीं लहान वयांतसुद्धां सहन झाले नाहींत. आणि त्या तसल्या अत्याचारांना आळा घालावा किंवा नाहीं, याबद्दल हल्लींच्या समाजद्रष्ट्यांमध्यें मतभेद! प्रत्येक मनुष्य जगामध्यें स्वतंत्र रीतीनें अस्तित्वांत येत असतां एकाचा जुलूम दुसऱ्यावर काय म्हणून चालावा? अथवा एकाच्या मायभूमीमध्यें दुसऱ्यानें त्यास काय म्हणून तुडवावें? हे विचारच जेथें अंतःकरणास पारखे झालेले, त्या ठिकाणीं समाजाच्या राजकारणाची व्याप्ति व्यक्तिस्वातंत्र्यावरून एकदम पारतंत्र्याच्या गर्तेमध्यें ढासळते यांत नवल नाहीं. परदास्यानें पछाडलेल्या दुर्बल अंतःकरणापुढें अनेक मोहक पिशाच्चें पिंगा घालूं लागतात. कोणास शांतता पाहिजे, कोणास वरचढपणा पाहिजे, कोणास परराज्यांतील झाडें चघळण्याचा मोह आवरत नाहीं, असे अनेक प्रकार राजकीय वातावरणांत खळबळत असलेले प्रत्यहीं नजरेस येतात. मी कोण आहें, आणि माझें ध्येय आणि कर्तृत्व काय असावयास पाहिजे, ही भावना एकत्वानें जेथें नाहीं, तेथें परदास्याचा पैलतीर केव्हांही दिसेल काय?

परमेश्वरानें जगांतील चराचर सृष्टीमध्यें एक तऱ्हेचा विशिष्ट गुण निर्माण करून ठेविलेला आहे. किंबहुना सृष्टीचें कार्य योग्य तऱ्हेनें चालावें हाच हेतु अनुलक्षून या गुणाची स्थापना सृष्टीची उभारणी करतांना मुद्दाम केलेली आहे. न्यूटनचा गुरुत्वाकर्षणाचा नियम किंवा निर्जीव पदार्थांमधील परमाणूंची एकमेकांमधील आकर्षणशक्ति अथवा सजीव प्राण्यांमधील निसर्गसिद्ध संघटणाची प्रवृत्ति या सर्वांमधून, फार काय, सर्व सृष्टीमध्यें दिसून येणारी धारणाशक्ति हीं सर्व एकाच लोकसंग्राहक तत्वाचीं निरनिराळीं रूपें आहेत. या गुणानें सृष्टीची धारणा होऊन उत्तरोत्तर गुणोत्कर्षानें तिची प्रगति होत आलेली आहे. या गुणास कोणी कांहीं नांव देतात, कोणी त्याचें स्वरूप एक प्रकारचें समजतात, तर कोणी दुसऱ्या प्रकारचें समजतात. परंतु या मूळ धारणेचें सामाजिक स्वरूप काय आहे ह्याचा विचार करणें सध्यां फार जरूरीचें आहे. मनुष्यजात जरी येथून तेथून सर्वत्र एकसारखीच आहे,

तरी गुणभेदानें अथवा पराक्रमभेदानें एक वर्ग दुसऱ्यापेक्षां आपणास कमी-अधिक श्रेष्ठ समजत असतो. वास्तविक पाहतां असा भेद करणें योग्य होणार नाहीं. परंतु दुसऱ्या कित्येक बऱ्यावाईट गोष्टींबरोबर तृष्णा ही एक मानवांच्या पाठीमागें एकसारखी लागल्यानें असे भेद व्हावयाचे टळणें शक्य नाहीं. अशा रीतीनें मानवजातीमध्यें अनेक भेद होण्याचें कार्य चालू असलें तरी या संघटनात्मक प्रवृत्तीमुळेंच तिचे शतशः तुकडे होण्याचें कार्य मात्र जेवढें जास्त वेगानें व्हावयास पाहिजे तसें चालत नाहीं. आजपर्यंत जगांत विलयास गेलेल्या अनेक साम्राज्यांच्या इतिहासांचें निरीक्षण केल्यास आपणांस हेंच दिसून येईल. चक्रनेमिक्रमानें एका पाठीमागून दुसरा असा क्रम एकसारखा चालूच आहे. चक्राचा एक भाग वर येण्यास ज्याप्रमाणें कांहीं गोष्टी कारणीभूत होतात, त्याचप्रमाणें तो भाग कालांतरानें अधोगतीस जाऊं लागण्यासही दुसरीं कांहीं कारणें असतात ही गोष्ट वेगळी. समुद्रसपाटीपासून पुनः खालीं अथवा खालून वर याप्रमाणें खळबळ जलसंचयामध्यें अथवा वातावरणामध्यें कांहीं विशिष्ट कार्याकरितां चालू असते; त्याचप्रमाणें या जीवसृष्टीची खळबळही याच ठराविक उद्दिष्टासाठीं नेहमीं चालू असते. आणि या खळबळीस चालक अशीं जीं साधनें वारंवार उत्पन्न होतात, त्या साधनांपैकींच संघटनाकार्य हें प्रमुख आहे. घटकावयव विलग झाले म्हणजे त्यांतील चेतनाशक्ति कमी होते. ईश्वरी अंशाचें प्रमाण ज्या मानानें सृष्टींतील यच्चयावत वस्तूंमध्यें असावयास पाहिजे त्या मर्यादेची शेवटची पायरी समाजानें गांठली म्हणजे त्याच्या अस्तित्वास धोका येण्याचा संभव असतो. येथून ही परिस्थिति बदलण्यास सुरवात होते अज्ञानसंमूढ जनसमाजास संघटनाची जरूरी भासूं लागते. समाजाच्या विगलित अंगांमध्यें चेतना येण्यासाठीं त्यांतील जीवशक्तीची वाढ होणें जरूर असते. ही वाढ जसजशी होऊं लागते त्या त्या मानानें तिचें खरें दैवी स्वरूप (अथवा तिच्या शक्तीचें प्रत्यक्ष दृश्य) आपणास उघड उघड व्यक्त होऊं लागतें.

' अधर्माच्या नाशाकरितां मी आपल्या दैवी शक्तीनें पुन: जन्म घेत असतों ' असें आश्वासन परमेश्वरांनीं दिलेलें आहे तें याच स्वरूपाचें आहे. अनेक राष्ट्रांचे इतिहास हेंच सांगतात. म्लेंछांचा जाच हिंदुस्थानांतून नाहींसा करण्याकरितां जे प्रयत्न मराठ्यांनीं केले, त्यांच्या कथा हल्लीं किती भाविकपणानें लोक ऐकतात ! डोंगरांतल्या उंदरास आज ' शिवाचा अवतार ' म्हणून लोक मानतात. समाजाच्या निकृष्ट स्थितीमध्यें, समाजांतील दैवी शक्ति जागृत होत असतांना अनेक सात्विक–गुणांचा विकास होत असतो. परमेश्वराचें प्रत्यक्ष अस्तित्व समाजास अशा वेळीं भासमान होऊं लागतें तें याच कारणासाठीं ! सात्विक गुणाच्या विकासानें समाजाची पायरी चढूं लागली म्हणजे परमेश्वरी शक्तीचा संचार त्या वेळीं भासूं लागतो. त्याचें दैवी स्वरूप अज्ञ जनांस मागाहून व्यक्त होऊं लागतें, तरी त्या विवक्षित कालीं तें अस्तित्वांत असतेंच. लो. टिळकांचें ' गीतारहस्य ' अथवा महात्मा गांधींचा ' सत्याग्रह ' हीं कशाचीं उदाहरणें आहेत ? हिंदुस्थानांतील समाजास आवश्यक तेवढी दैवी शक्ति या दोन्ही ठिकाणीं एकवटली आहे, असें समजण्यास हरकत नाहीं.

' अगा ये वैकुंठनायका । काय पाहतोसी कौतुका । धांव कलीनें गांजलें लोकां।' अशा तळमळीच्या हाका लोक मारूं लागले, त्या वेळीं शिवरायाचें दर्शन झालें ! शिवरायाच्या कर्तृत्वाची किंमत पृथ्वीच्या मोलानें होणार नाहीं. तोच आधार तुटला त्या वेळीं ' शिवरायास आठवावें। जीवित्व तृणवत् मानावें। इहपरलोकीं रहावें। कीर्तिरूपें।' असा समर्थांनीं मोठा मोलाचा उपदेश महाराष्ट्रास कळवळीनें आणि जिव्हाळ्यानें केलेला आहे !

शिवरायाचें आठवावें रूप ।
शिवरायाचा आठवावा प्रताप ।
शिवरायाचा आठवावा साक्षेप ।
भूमंडळीं ॥

शिवरायाच्या गुरूंनीं आपल्या शिष्याबद्दल हें दिलेलें सर्टिफिकेट आहे व तें आपल्या डोळ्यापुढें ठेवून त्याप्रमाणें वर्तण्याबद्दल आपल्या आवडत्या महाराष्ट्रास हा जिव्हाळ्यानें निरोप दिलेला आहे. त्यावरून शिवाजीमहाराजांची योग्यता त्या कालीं देखील केवढी सात्विकपणाची मानली जात असे हें व्यक्त होतें व त्यांच्या देहावसानानें त्या वेळीं महाराष्ट्रास केवढा जबरदस्त धक्का बसला असेल त्याची कल्पना देखील करवत नाहीं! महाराष्ट्राच्या जिवंतपणाची ती एक ज्योत निर्माण झाली होती आणि तिचें कार्य तिनें केलें. तिची उज्वलता एवढी मोठी होती कीं, तिचें स्फुरण अद्यापि प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या हृदयास फुरफुरवित असतें. महाराष्ट्राचें सुदैव, महाराष्ट्राचें सत्व, महाराष्ट्राचा निस्वार्थीपणा, महाराष्ट्रांतील सर्व चांगले गुण त्या वेळीं फळास आले होते! 'मराठा तितुका मेळवावा' हें त्या वेळचें ब्रीदवाक्य महाराष्ट्रांत अद्याप दुमदुमत आहे. महाराष्ट्राची ती दैवी शक्ति महाराष्ट्रच काय पण अखिल भरतवर्षाच्या हितास कारणीभूत झाली. 'भगवा झेंडा' अद्याप डोळ्यापुढें दिसतोसा भास होतो! महाराष्ट्राचे सात्विक प्रयत्न फळास आले ते विभूतिरूपानें पुढें आले असले, तरी त्यांतील मुख्य गोम म्हणजे महाराष्ट्राचें सत्व होय! महाराष्ट्रामध्यें असलेली संघटणाशक्ति हीच व्यक्तिरूपानें कार्य करून गेली. संघटणा असल्याशिवाय शक्ति येणें शक्य नाहीं; आणि हीं दोन्ही अंगीं बाणल्यास शिवप्रभूचें अवतारकार्य महाराष्ट्रीय जन तेस शेवटास नेणें अशक्य नाहीं.

प्रस्तुत राजकारणामध्यें विन्मुखतेचा दोष फार मोठा आहे. कोणत्याही देशाचें राजकारण पाहिलें तर प्राचीन कालापासून अगदीं म्युसोलिनीपर्यंत देशाची शक्ति एकवटण्याचे प्रयत्न झाल्याशिवाय त्यास यश मिळणें फार दुरापास्त असल्याचें दिसून येतें. विगलित शक्तीचा परिणाम कमकुवत असतो. शक्ति एकवटली म्हणजे तिचा उपयोग परिणामकारक होतो. परंतु प्रस्तुत राजकारणांत, मूळ समाजशक्तीचा पत्ताच नाहीं व आहे ती बोलघेवडेपणाची

शक्ति, लिबरल, मजूर, जहाल, मुसलमान वगैरे अनेक मार्गांनीं चोहोंकडे धांवते आहे. त्यामुळें, एवढी प्रचंड शक्ति पण ती विन्मुख असल्यानें, ती असल्याबद्दल प्रत्येक घटकावयवास आज शंका येत आहे !

महाराष्ट्रानें या परिस्थितीकडे इतर प्रांतांप्रमाणें तटस्थवृत्तीनें पाहून चालणार नाहीं. हिंदुस्थानांतील राष्ट्रीयसभा, ठराव, कौंसिलें आणि लपंडाव करा, हरकत नाहीं. पण महाराष्ट्रानें' मी कोण' हें विसरून चालणार नाहीं. महाराष्ट्रानें हिंदुधर्म राखला व वाढविला, महाराष्ट्रानें त्यास उज्वल स्वरूप दिलें, महाराष्ट्रानें तो आतां जगामध्यें पसरविला पाहिजे ! महाराष्ट्रानें हिंदुस्थानास एक वेळ सोडविलें. तेंच कार्य पुनः तडीस नेण्याचें कर्तव्य महाराष्ट्राचें आहे व तें महाराष्ट्रानें अभिमानपूर्वक केलें पाहिजे ! ह्या गोष्टीचा महाराष्ट्रास अभ्यास आहे, त्याला शक्ति आहे, युक्ति आहे आणि बुद्धि देखील आहे ! हिंदुस्थानच्या नाक्यावर पसरलेला महाराष्ट्र हिंदुस्तानचा वाली आहे ! जगामध्यें अत्युत्कृष्ट असा धर्म महाराष्ट्राच्या घरीं आज नांदत आहे ! कोठें कौंसिलवाद आणि कोठें हें अत्युच्च कर्तव्यपालन ! गोखल्यांची दृष्टि फेकून द्या आणि बिस्मार्कची घ्या ! पुढें कालांतरानें शक्ति येईल. जर्मनीमध्यें प्रशियाची जबाबदारी प्रशियानें पार पाडली, त्याप्रमाणें महाराष्ट्रानें आपली जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्राशिवाय हिंदुस्थान व्यर्थ आहे, ही महाराष्ट्राची योग्यता ओळखा. महाराष्ट्रानें आपलें विशिष्टत्व न राखतां दुसऱ्याच्या बुद्धीनें जाण्याचा प्रयत्न केल्यास सर्व हिंदुस्थानचा गाडा असाच खिळून राहणार. असेंब्लीमधील पोकळ देखाव्यापेक्षां खुद्द महाराष्ट्रांतील देखाव्यांनीं पार्लमेंटला चकीत करवा. डॉ. सन्यत्सेन, आफगाणिस्ताचे राजेसो, रिझाखान, केमाल, लेनिन, म्युसोलिनी ह्या सिंहांची वृत्ति पहा. नुसतें सिंहाचें पांघरूण आयतें मिळाल्यानें कर्तृत्वाचा देखावा त्यामध्यें कोणास दिसत नाहीं. लोकांस स्वावलंबनाचा उपदेश करणाऱ्यांनीं परावलंबी जीवितामध्यें जन्म घालवून, हातीं आलेल्या संधीचा असा गरीब-

पणानें उपयोग करून दाखविला म्हणजे त्यासच लोक दुबळेपणा म्हणतात. "जे कां रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले।" वगैरे महाराष्ट्रराजकारण-अग्रणींचे अजून कानामध्यें दुमदुमणारे शब्द महाराष्ट्र विसरला नाहीं! महाराष्ट्राची किंमत काय आहे? त्यास कोणत्या साह्याची जरूरी आहे? त्यास आपलासा कसा करून घ्यावयास पाहिजे व त्याच्या शक्तीचा उपयोग कोणीकडे करावयास पाहिजे ह्याचा विचार देखील स्वप्नीं येणें शक्य नाहीं, तेथें केसरीचें पांघरूण घेऊन नेहमींच्या स्वरूपाच्या नुसत्या चर्वितचर्वणानें कार्य होईल काय? प्रशियाचें उदाहरण सोडून गरीब आयर्लंडची कास धरण्यानें कोठें राजकारण साधतें? स्वतःची कंठाळ दुसऱ्या एकाद्या शेळीच्या गळीं उतरवली म्हणजे महाराष्ट्र जागा होतो थोडाच! ज्यांस व्यवहारज्ञान नाहीं, स्पष्टोक्ति नाहीं, धडाडी नाहीं, मोठा शब्द काढण्यासारखी कुवतही नाहीं, अशा लोकांच्या माथां, त्यांना झेपणार नाहींत असे विषय मारल्यानें, महाराष्ट्रराजकारणाचें उलट नुकसान आहे. महाराष्ट्र आणि लोकमान्य आणि लोकमान्य म्हणजे महाराष्ट्राचेंच नव्हे पण हिंदुस्थानचें राजकारण, अशी ही सांगड आहे. ती तशीच पुढें चालविण्यास त्यांच्या धडाडीचे तरुण पाहिजेत. नुसतें वर्तमानपत्र ( आणि तेंही लोकांची भक्ति आहे म्हणून चालणारें ) चालविण्यानें अगर लोकांनीं निवडून द्यावें ह्मणून प्रार्थना केल्यावर कौंसि-लांत मिरविण्यानें लोकमान्यांच्या गादीची पूर्तता होत नाहीं. समाजाच्या राजकारण-शक्तीच्या पुढें एक पाऊल पुढाऱ्याचें पाहिजे! लो. टिळकांच्या पुढें बॅ. सावरकर हा देखावा नेहमीं पाहिजे! परंतु हल्लीं पहावें तो लोकांनीं निवडून दिलें म्हणजे मग असेंब्ली दिसते! यास काय महाराष्ट्र म्हणावें का ब्रह्मदेश म्हणावें!

लोकांबद्दल यत्किंचित् कळकळ तरी कोणास वाटते काय? 'अहो रूपं, अहो ध्वनिः' याप्रमाणें एकमेकांस ओवाळून महाराष्ट्रीय नांवाखालीं एक-मेकांची नुसती आरती ह्या लोकांनीं चालविली आहे. समाजाविषयीं कोणा-

कांहीं प्रयत्न करीत नाहींत. उलट विचाराविरुद्ध आचार यांतच राजकारणाचें कौशल्य मानण्यांत येऊन दंडुकेशाही व्यवहारानें महाराष्ट्रीयपणा दडविला जात आहे. लो. टिळकांचें 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हें वचन कोणीकडे ? आणि हल्लींच्या राजकारणाचें हें भिन्न स्वरूप कोणिकडे ? महाराष्ट्रांत संघटना पाहिजे तर संघटनाशक्ति उदयास आणण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. प्रत्येक महाराष्ट्रियाच्या अंतःकरणास उचंबळविणारे प्रयत्न महाराष्ट्रांत (दिल्लीमध्यें नव्हे) झाले पाहिजेत. देशाविषयीं देशाभिमान, एकी, आपलेपणा हीं स्वस्थ बसून उत्पन्न होत नाहींत. जिवंतपणानें चालविलेल्या राजकारणामध्यें असेंब्लीमध्यें "मी आपली लोकप्रियताही गमावून बसलों" अशी रडण्याची पाळी येत नाहीं. आजकाल पूर्वीचा जोम उत्पन्न केल्यास राजकारणामध्यें पाठीशीं पाठ देणारे हजारो तरुण भटकताहेत. त्यांना कोणी वाट दाखवून देत नाहीं ! त्यांच्यापुढें ध्येय नाहीं, धंदा नाहीं. ते आहेत अगर नाहींत याची कोणी दाद देखील घेत नाहीं !

याउप्पर महाराष्ट्र तरुणांनीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पहाणें अशक्य आहे. फुटक्या कवडीचा उपयोग केव्हांही होत नसतो. 'संघशक्तीनें आपला मार्ग आपण पहाणें हेंच केव्हांही इष्ट आहे.' असें आमच्या बुद्धया पुढाऱ्यांचें सांगणें आहे. तेंच त्यांचें हृद्गत आहे. तरुणांस जर मार्ग हवा असेल तर संसारामध्यें न पडतां महाराष्ट्रजनतेचा सर्व तऱ्हेनें उद्धार करण्याचें पवित्र कार्य हातीं घेणें हेंच होय. लो. टिळक यांनीं कर्ममार्गाचा धडा घालून दिलेला आहे. सनातन आर्यधर्माचें कार्य अगदीं अज्ञात कालापासून चालत आलेलें आहे आणि खुद्द कर्मयोगासही पुष्कळ वेळां कमीअधिक असे अडचणीचे प्रसंग अनेक वेळां सोसावे लागले आहेत. त्यानंतर हा दिव्य मार्ग पुनः एकदां गीतारहस्यद्वारा लोकमान्यांनीं प्रज्वलित केलेला आहे. हिंदुस्थानांतील परिस्थितीमुळें केवळ हिंदुस्थानासच नव्हे पण धर्म या दृष्टीनें सर्व जगास या दिव्य ज्ञानाची फार जरूरी आहे. गीतारहस्याच्या उदया-

बरोबर कर्मयोगास उत्तेजन देण्यासाठीं 'कर्मयोगाश्रमा' सारखी एखादी संस्था असावी, अशी एक कल्पना फार दिवसांपूर्वी वाचण्यांत आलेली आठवते. परंतु त्याप्रमाणें ती अस्तित्वांत आल्याचें कोठें ऐकिवांत नाहीं. हल्लींच्या बहुजनसमाजाच्या मानानें पहातां, असली एखादी संस्था सुद्धां या कामीं अगदीं अपुरी अशीच वाटेल. कारण सामान्य जनतेपर्यंत कर्मयोगाची लाट पोंचविण्यासाठीं प्रचंड प्रयत्नाची जरूरीच फार आहे. श्रीरामदास यांनीं श्रीरामउपासनेचा क्रम पूर्वी वाढविला, त्यांना देखील एखाद्या मर्यादित आश्रमाचें क्षेत्र पुरें पडलें नाहीं व रामउपासनेच्या प्रसारासाठीं त्यांचे रामदासी त्या वेळीं त्यांना अमर्यादपणें चोहोंकडे पेरावे लागले. कर्मयोगाचें क्षेत्रही असेंच विस्तृत ठेवल्याशिवाय त्याचा जनतेस सर्वत्र फायदा मिळणें शक्य नाहीं. कर्मयोगाचें ध्येय केवळ स्वातंत्र्य अगर जनतेचा उद्धार वगैरे मर्यादित स्वरूपाचें असूं शकत नाहीं. सनातनधर्माचा हा एक दिव्य मार्ग आहे आणि तो केवळ हिंदु अगर हिंदुस्थान यांसाठींच नसून जगाचा उद्धार करणें हेंही त्याचें ध्येय आहे. त्यास आपपर असें कोणी नाहीं. त्याची मर्यादा वाटेल तेवढी वाढवितां येईल. ऐहिक संसारयात्रा योग्य रीतीनें पार पाडून परमार्थिक कल्याण सर्वांत उत्कृष्ट रीतीनें कसें साधतां येईल याची कर्मयोग ही एक सोपी युक्ति आहे. कर्मयोगाकरितां हल्लींची परिस्थिति सोडून जंगलांत रहावयास नको अगर हल्लींच्या व्यवसायामध्यें कोणत्याही तऱ्हेचा फरक करण्याचीही जरूरी नाहीं. दिवसापाठीमागें दिवस जातात व त्यापासून सार्थक्य कांहीं होत नाहीं. तें कसें साधावें तें या मार्गाच्या आचरणानें समजतें. निर्जीव जीवनक्रमामध्यें प्रवृत्तिलक्षणाचा मिलाफ करवून निष्काम प्रवृत्तीनें व्यवसाय करण्याची ही एक युक्ति आहे. निर्जीवपणें प्रकृतीचा सर्वस्वी दास होऊन राहण्यांत मनुष्यास कांहीं हानि वाटत नाहीं, हेंच एक जगांतील पहिलें मोठें आश्चर्य म्हटलें तरी चालेल ! या मायेच्या पसाऱ्याचें हें स्वरूप न समजल्यामुळें मेंढराप्रमाणें एकामागें एक कित्येक पिढ्या आजपावेतो

गेल्या व पुढेंही जातील. परंतु अज्ञानानें त्याचें कोणास कांहीं वाटत नाहीं व वाटणार नाहीं. या अडाणीपणाच्या स्थितीपेक्षां जागेपणानें राहून, ऐहिक जीवितार्चे महत्त्व ओळखून तें चालविलें, तर आंधळ्यापेक्षां डोळसास जो डोळ्यांचा ज्यास्त फायदा असतो, तोच मिळाल्यासारखें होणार नाहीं काय ? दृश्यसृष्टींतील अनेक विलोभनांचा लोभ धरून नानाप्रकारच्या शृंखला पायामध्यें मुद्दाम अडकवून घेतल्या जातात व त्यांच्या योगानें पुढें राष्ट्रेंच्याराष्ट्रें रसातळास जातात, त्यापेक्षां या दिव्य विचाराची कांस धरून केवळ स्वतःचीच नव्हे पण जगाची उन्नति साधण्याचा प्रयत्न, फुकट मरून जाण्यापेक्षां एकाद्या महाराष्ट्रयुवकानें केल्यास, त्यांत मानवी जातीचें केवढें कल्याण सांठविलेलें असेल याची कोण कल्पना करूं शकेल ? प्रस्तुत चालू असलेल्या जीवनकलहामध्यें मानवीशक्तीचा व्यय भलत्याच दिशेनें कसा होत आहे हें दिसतच आहे. हा व्यय हाही एक प्रकारचा कर्मयज्ञच आहे. परंतु हा कर्मयज्ञ समजून उमजून चाललेला नाहीं. आसक्तिप्रधान या यज्ञानें जंतु बांधला जात आहे. तोच आसक्तिविरहित कर्मयोग्याप्रमाणें वर्तू लागेल तर जगाचें सर्व स्वरूप पालटल्यासारखें दिसेल. व्यक्तिजन्य संसारामध्यें ज्या प्रथम व्यक्ति, नंतर कुटुंब, देश, अखिल जगत्, अशा पायऱ्या दिसतात, त्याच जर उतरत्या भांजणीनें अमलांत आणण्याची तजवीज होईल, तर असत्याचा जगांतून या क्षणास नायनाट होईल. हल्लीं जरी महाराष्ट्रापुढें स्वराज्य व स्वदेश हेच प्रश्न आहेत तरी जेथें टिळक आगरकर गांधी निपजतात तेथें जगास मार्ग दाखविणारा एकादा कर्मयोगी निपजून लो. टिळकांनीं आपल्या गीतारहस्याच्या प्रस्तावनेंत व्यक्त केलेली आशा पूर्ण करून त्यांच्या ऋणांतून मुक्त होऊन त्यांच्या परस्थ आत्म्यास चिरकालिक शांतीचा लाभ तो करून देणार नाहीं कशावरून ?

महाराष्ट्रधर्म वाढवावा । भारतीं सुदृढ करावा ।
त्रिखंडीं विखुरावा । आत्मबोधालागीं ॥ १ ॥

REFBK-0003573